पुणे, किशोर– वर्ष ५३, अंक १ ला, जानेवारी २०२४, (मासिक)– किंमत रु. ७/– पृष्ठे– ५२
Pune, Kishor- Vol. 53, Issue- 1, January 2024 (Monthly)- Price Rs. 7/- Pages- 52

# किशोर

जानेवारी २०२४



# देश हा!

■ मनोहर आंधळे

अविश्रांत कष्टणाऱ्या माणसांचा देश हा
जनां मनांस जोडणाऱ्या, जाणिवांचा देश हा!
कापलेत पंख हे, मोडले घरटे जरी
राखेतूनी भरारणाऱ्या पाखरांचा देश हा!
आसेतू हिमाचल...माय एक भारती
हाचि भाव जागणाऱ्या लेकरांचा देश हा!
हीच नित्य प्रार्थना विश्वात सौख्य नांदू दे
पसायदान मागणाऱ्या ज्ञानियांचा देश हा!
मातीत या रुजले इथे त्याग, शील, शौर्य हे
शिव, प्रताप, पद्मिनी अन् गौतमांचा देश हा!
लावती बाजी जिवाची तिरंगाध्वज राखण्या
वीरमरण झेलणाऱ्या वैभवांचा देश हा!

संपर्क – ९४२१५१२५७०

**किशोर** जानेवारी २०२४, वर्ष ५३ वे, अंक १ ला, मार्गशीर्ष/ पौष, शके १९४५



▶ **संपादक :**
कृष्णकुमार पाटील, संचालक,
महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे

▶ **प्रकाशक :**
विवेक उत्तम गोसावी
नियंत्रक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळ, प्रभादेवी, मुंबई

▶ निर्मिती अधिकारी : हेमंत बाबर

▶ अक्षरजुळणी : किशोर विभाग

▶ **कार्यकारी संपादक :**
किरण केंद्रे



▶ वितरण व्यवस्थापक
जालिंदर पाटील

▶ मुखपृष्ठ : श्रीनिवास प्रभुदेसाई
संपर्क : ९८३३७६७०३५

▶ चित्रांकन : *चारूहास पंडित, घनश्याम देशमुख, धनश्री केळकर, राजेंद्र गिरधारी, अजय विभुते, गणेश ढवळे, योगिता धोटे, अमृता ढगे, माईंडइंट संवाद, जैत्र डिजिटल*

## अंतरंग


- देश हा ! ........ *मनोहर आंधळे* ........ ०२
- पत्राची गंमत ........ *प्रियंवदा करंडे* ........ ०६
- ज्ञानज्योत ........ *संगीता बाजीराव ठुबे* ........ ११
- ...आणि ढोलूराम पोहायला शिकला ! ........ *मुकुंद टाकसाळे* ........ १२
- राजमाता जिजाऊसाहेब ........ *मोगल जाधव* ........ १६
- संक्रांतीचा सण ........ *सुचित्रा पवार* ........ १९
- विज्ञानाशी मैत्री ........ *पंडित विद्यासागर* ........ २०
- चला चित्र रंगवूया ........ *धनश्री केळकर* ........ २२
- बोगदा ........ *रस्किन बॉण्ड* ........ २३
- बालकाच्या मनातील निसर्ग ........ *रेखा वाल्मिक मराठे* ........ २९
- दहा रुपयांचे भांडवल ........ *मनोहर महादेव भोसले* ........ ३०
- गंमत कोडे ........ *घनश्याम देशमुख* ........ ३२
- हिरवाई ........ *निर्मला सु. देशपांडे* ........ ३३
- मोबाईल फोनचे दुष्परिणाम ........ *प्रा. जी. एन. हंचे* ........ ३४
- पोस्टमन काका ........ *रवींद्र चालीकवार* ........ ३७
- कुतूहल ........ *अमित डहाणे* ........ ३८


### बालविभाग


- भावी आधारस्तंभ ........ ४०
- उमलती प्रतिभा ........ ४२
- चित्रकथा : पाठलाग ........ *घनश्याम देशमुख* ........ ४४
- गंमतपूरची राणी ........ *मंदा खांडगे* ........ ४६




### ENGLISH SECTION


- A Voyager's Story ........ ***Aditya A. Gadhe*** ........ ४७
- The Priceless Gifts ........ ***Smita Pramod Saraf*** ........ ४८
- Funny Puzzle ........ ***Ghanshyam Deshmukh*** ........ ५०


▶ ऑनलाइन वर्गणीकरिता : www.kishor.ebalbharati.in

वार्षिक वर्गणीची रक्कम रु.८०/- मनीऑर्डर अथवा कोणत्याही राष्ट्रीयीकृत बँकेच्या पुणे शाखेवरील डिमांड ड्राफ्टद्वारे संचालक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक मंडळ, या नावाने खाली नमूद केलेल्या पत्रव्यवहाराच्या पत्त्यावर पाठवावी. धनादेश स्वीकारला जाणार नाही.



**पत्रव्यवहाराचा पत्ता: कार्यकारी संपादक, किशोर, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ,** सेनापती बापट मार्ग, पुणे- ४११००४, संपादकीय : ०२०- २५७१६१०७, वितरण व तक्रार : ०२०-२५७१६२४४, ई-मेल : executive_editor_kishor@ebalbharati.in

# किशोर : एक आनंददायी प्रेरणास्थान

आमच्या जि .प. प्रा. शाळा, कडू वस्ती, सात्रळ येथे दरमहा किशोर मासिक अंक येतात. शाळेत अंक आल्या आल्या वाचनासाठी चढाओढ लागते. मुले वाचनाचा आनंद घेतात.

वाचनाने मन प्रगल्भ बनते. ज्ञानासाठी वाचन करतात. ज्ञानाची कक्षा विस्तारण्यासाठी धडपड करतात. गोष्टी वाचन हा त्यांचा छंद! बोधकथा वाचन करून परिपाठात सांगण्याची त्यांना छानशी सवय लागली. आम्हांला कौतुक वाटते. किशोरमुळे हे सर्व शक्य झाले आहे. किशोरच्या संपूर्ण संपादकीय टीमला धन्यवाद!

असाच दर्जेदार साहित्य खजिना दरमहा आमच्या भेटीस उपलब्ध करून द्यावा. किशोरच्या नवीन वाटचालीस शुभेच्छा.

**श्री. राजेंद्र नारायण शिंदे**. (मुख्याध्यापक)
जि. प. प्रा. शाळा, कडू वस्ती (सात्रळ)
ता. राहुरी. जि. अहमदनगर, पिन : ४१३७११

प्रिय किशोर,

आमच्या शाळेत दर महिन्याला किशोरचे मासिक येते. ते आम्हांला आमचे सर नियमित वाचायला देतात त्यामुळे मला वाचनाची खूप आवड लागली. किशोर मासिकातील गोष्टी कोडी, कविता, मुलांची चित्रे, मुलांचे अनुभव वाचून मलासुद्धा लिहिण्याची प्रेरणा मिळाली.

**श्रावणी संतोष दगडे**
इयत्ता ७ वी, जि. प. प्रा. केंद्रशाळा अंदोरी,
ता. खंडाळा, जि. सातारा, पिन –४१५५२१

# वाचन संकल्प




किशोर मित्र मैत्रिणींनो,

सर्वप्रथम तुम्हां सर्वांना नववर्षाच्या खूप साऱ्या शुभेच्छा ! नवे वर्ष म्हटले की लहानांपासून मोठ्यांपर्यंत सर्व जण या वर्षात मी नवनवीन काय करणार आहे या संकल्पांची यादी करायला, त्याबाबत एकमेकांशी चर्चा करायला सुरुवात करतात. पुढे त्यातील किती संकल्प पूर्ण होतात, किती अर्धवट राहतात, किती बारगळतात हे आपण दरवर्षी स्वतःसुद्धा अनुभवत असतोच ना ? पण म्हणून कोणी संकल्प करायचे सोडत नाही. आपल्यापैकी अनेक जण मात्र नेटाने, शिस्तीने आणि प्रामाणिकपणे हे संकल्प पूर्ण करतात व नवनवीन,चांगल्या संकल्पाच्या तयारीला लागतात. तुम्ही आजूबाजूच्या अशा यशस्वी संकल्प करणाऱ्या माणसांना कधी भेटला आहात का ? त्यांच्या संकल्पपूर्तीमुळे त्यांना झालेल्या आनंदाचा अनुभव घेतला आहे का ? तुम्ही जरूर अशा संकल्प यात्रींना भेटा, त्यांनी वर्षभर शिस्तने पूर्ण केलेल्या संकल्पामुळे त्यांना काय काय फायदा झाला हे त्यांच्याकडून समजून घ्या. त्यातून तुम्हांला जे काही गवसेल ते तुमच्यासाठी आयुष्यभराची मौल्यवान ठेव होईल यात तिळमात्र शंका नाही. आणि हो तुम्हीसुद्धा यशस्वीपणे तुमच्या संकल्पांची पूर्ती करू शकाल हासुद्धा फायदा आहेच की !


किशोर मित्र मैत्रिणींनो, तुम्ही या महिन्याच्या अंकाचे मुखपृष्ठ पाहिले का ? आपले मुखपृष्ठसुद्धा एका संकल्पाबद्दल तुमच्याशी बोलते आहे ना ? तुम्ही सर्वांनी मिळून वाचन संस्कृती वाढवावी, जोपासावी म्हणून तुम्हांला काहीतरी सांगू पाहते आहे ना ? काय म्हणता ? तुम्ही सर्व जण वाचन संस्कृती जोपासण्याचा संकल्प करणार आहात ? वाह ! भले शाब्बास ! तुम्हाला सांगतो आपल्या या जगात वाचनासारखा उत्तम मित्र, उत्तम छंद दुसरा कोणताच नाही. माणसाला माणूस बनवणारी,आपल्याला विचार करायला लावणारी, जीवनाला नवी दिशा, नवी आशा देणारी वाचनासारखी मौलिक गोष्ट कोणतीच नाही. छंद, मनोरंजन, अभ्यास, रिकाम्या किंवा अडीअडचणीच्या, दुःखाच्या वेळचे साधन अशी वाचनाची कितीतरी रूपे आहेत. वाचन ही कलादेखील आहे. व्यासंग आहे. साधना आहे. आपण माणूस म्हणून किती भाग्यवान आहोत ना , की आपण बोलू शकतो, लिहू शकतो आणि आपण वाचू शकतो.. ही भाषेची देणगी दुसऱ्या कुठल्याच प्राण्याला मिळालेली नाही. इतक्या अमूल्य देणगीचा आपण मनापासून स्वीकार करत स्वतःला घडवायला हवे, फुलवायला हवे. आपल्या आणि आपल्या सभोवतालच्या प्रत्येकाला वाचनसमृद्ध आणि संपन्न करायला हवे नाही का ?

तुम्हांला माहीत आहे का, वाचन हा शब्द 'वच्' धातूपासून तयार झाला आहे. 'वच्' धातूचा अर्थ होतो सांगणे, बोलणे, पुकारणे, म्हणणे, भाषण करणे, वर्णन करणे.. पहा एका शब्दाच्या किती छटा आहेत ना ? आता हेच पहा ना, वाचन, वाचा, वाच्य, वाच्यता, वाच्यांश, वाच्यार्थ यासारख्या वाचनाशी निगडित शब्दांनी वाचनाची व्यापकता किती मोठी आहे हे लक्षात येते ना ? गमतीचा भाग म्हणजे 'वञ्च'पासून वेगवेगळ्या भाषेत वाचन शब्दाला ओळख मिळाली आहे. वाचणे (मराठी ) बाँचना (हिंदी), वंच (प्राकृत), वच्यते (संस्कृत), वज्जति (पाली), बाचा (बंगाली), वाजणु (सिंधी),बंचिबो (ओडिया), बॉन्चु (नेपाळी) हे सारे शब्द वाचनसूचक आहेत. ग्रंथाशिवाय मी जगूच शकणार नाही असे थोर समाजसुधारक, भारतीय घटनेचे शिल्पकार आणि प्रकांड वाचक डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते; तर अन्न, वस्त्र, निवारा या मूलभूत गरजांनंतर सुशिक्षित, सुसंस्कृत माणसाची वाचन ही चौथी मूलभूत गरज असते, असायला हवी. असे लेखक, समीक्षक डॉ. द. भि. कुलकर्णी यांनी लिहून ठेवले आहे. यावरून 'वाचन' ही आपणा सर्वांसाठी किती अत्यावश्यक बाब आहे हे लक्षात येते.

किशोर मित्र मैत्रिणींनो, रोजच्या दिवसातला किमान अर्धा ते एक तास अवांतर वाचनासाठी राखून ठेवा. निदान दररोज किमान दोन पाने वाचलीच पाहिजेत असा नियम करा. त्याकरिता सुट्टीत शाळेच्या, गावच्या, आपल्या परिसरातील ग्रंथालयात वाचन करा. मित्र-मैत्रिणी आई-बाबा, दादा-ताई यांच्या वाढदिवसाला छान छान पुस्तके भेट द्या आणि वाचन संस्कृतीला जोपासण्यासाठी नक्की हातभार लावा.

**– किरण केंद्रे**
कार्यकारी संपादक





प्रियंवदा प्र. करंडे

# पत्राची गंमत




दारावरची बेल वाजली, तशी गौरी धावतच दार उघडायला गेली. दार उघडलं तर दारात तिच्या अपेक्षेप्रमाणे पोस्टमनकाका उभे! तिने अधीरपणे विचारलं,

“काका, काका, आज माझं पत्र आलं ना? द्या ना मला लवकर!” “नाही बाळ, नाही आलं तुझं पत्र आजपण!” पोस्टमनकाकांनाही सांगताना वाईट वाटत होतं. बिचारी गौरी हिरमुसली. अगदी रडकुंडीला आली. तिला कळतच नव्हतं की, माझ्या आवडत्या

लेखिकाताईंनी मला पत्र पाठवायचं प्रॉमिस केलं होतं, माझा पत्तापण घेतला होता, आणि.... आणि इतके दिवस झाले पण त्यांचं पत्रच आलं नाही. गौरी विचार करत होती, तिने टेबलाजवळ येऊन घरचा अभ्यास करायला सुरुवात केली. पण छे! काही केल्या आता तिचं अभ्यासात मन लागेना.

इतक्यात तिची आई तिच्या खोलीत येत म्हणाली, "गौरी, अगं कोण आलं होतं?" बोलता बोलता तिने हातातला दुधाचा ग्लास टेबलावर ठेवा. गौरी तरीही गप्पच होती. "बाळा, काय झालंय ? कोण आलं होतं गं..." आईने तिचा उदास, उतरलेला चेहरा पाहून मायेने तिच्या डोक्यावरून हात फिरवत विचारलं. आता गौरीचा बांध फुटला. आईला मिठी भारत मुसमुसत ती म्हणाली, "आई, अगं आजसुद्धा माझ्या लेखिकाताईंचं पत्र नाही आलं गं! आई, त्या मला विसरल्या बहुतेक!" "नाही गं राणी," तिला प्रेमाने थोपटत आई म्हणाली, "अगं, त्यांना वेळ नसेल मिळाला पत्र लिहायला, आणि अगं, तूसुद्धा थोडा धीर धर!" आईने समजावलं. गौरीने नुसती मान डोलावली, "ए वेडाबाई, नंदी बैलासारखी मान काय डोलावतेस? आणि हे काय? तुझा आवडीचा गोडाचा शिरा अजून उष्टावलाही नाहीस तू? चल, चल लवकर खाऊन घे तुझा नाश्ता! आणि हो, दूधही पी!" आई हसत हसत बोलत होती. आता गौरीला सुद्धा हुरूप आला. आईच्या छान हसण्यात आणि लाघवी, मिस्कील बोलण्यात केवढी जादू आहे, असं तिला वाटलं. आणि हो, आपल्या लेखिकाताईंच्या लेखनात पण किती आपुलकी आहे. त्यांच्या 'भाऊबीज भेट' या गोष्टीतून तर आपल्याला केवढा आनंद मिळाला, किती मज्जा वाटली... गौरी पुन्हा तिच्या पत्राच्या विचारात अडकली. "नाही, नाही, आता मी जराही म्हणजे जराही रडणार नाही! पत्र येणार, अगदी लवकर येणार पत्र..." असं स्वतःशीच मोठ्याने म्हणत गौरीने पटापट शिरा खायला सुरुवात केली.

"अगं, दादा मगाशीच आला आणि पुन्हा बाहेर गेला...." आई भाजी फोडणीला टाकत म्हणाली. "म्हणजे? कुठे गेला?" हातातले मासिक सेंटरपीसवर ठेवत गौरी उठली नि स्वयंपाकघरात गेली. आई तिला पाहून म्हणाली, "गेला आहे गं मित्रांबरोबर! आता नाताळची रजा आहे तर म्हणाला, मस्तपैकी फिरून येतो... झालंच तर नवी बॅट आणतो... पिझ्झा खातो..." तिला मध्येच अडवत गौरी म्हणाली, "आई, अगं मस्करी करतेस ना माझी? खरंच दादा मजा करायला गेलाय? मग मीही जाणार सोनालीबरोबर!"

"अगं वेडे, गंमत करते गं, येईलच दादा क्लासमधून आता.. आणि काय गं ठमे, तू सहावीत आहेस नि दादाची कसली बरोबरी करतेस गं?" आईने तिचा गालगुच्चा घेत म्हटलं.

"मीही तेच म्हणतो! चांगला, धम्मकलाडू देतो मी पण!" म्हणत दादाने घरात प्रवेश केला. हातातली पुस्तकांची, वह्यांची बॅग त्याने सेंटरपीसवर ठेवली. "अस्सं काय? मला धम्मकलाडू देणार तू दादा? त्याआधी माझ्या हातची खमंग चापटपोळी खा!" असं म्हणत गौरीने दादाच्या पाठीत खरंच एक चापट मारली, तसा तिचा दादा हसतच सुटला. "ए, हसतोस काय रे? एवढं मारलं तरी?" गौरीने वेडावत विचारलं. "अगं, गौरे, तुझ्यात दम नाहीए, अगं मला कळलं पण नाही तू मारलंस ते!" दादा तिला चिडवायला लागला तशी आता गौरीला काय करायचं कळेचना. आईच्या पदराला धरून ती गाल फुगवत म्हणाली, "आई, बघ ना गं! दादा मला किती त्रास देतो..." "झाऽऽलं! रडूबाई लागली रडायला! दादाने गंमत केली, आलं रडू! आई जरासं काही बोलली, लागल्या गंगा यमुना वाहायला

डोळ्यातून... लेखिकाताईंचं पत्र आलं नाही... तर हुंदक्यावर हुंदके फुटतात आमच्या गौरीला..." दादा बोलतच सुटला तशी आता मात्र पत्राचा संबंध आल्यावर ती एकदम हळवी झाली. दादाच्या जवळ जाऊन तिने म्हटलं, "दादा, नको रे पत्राची आठवण! ए सांग ना रे, लेखिकाताई मला खरंच पत्र पाठवतील ना रे? खूऽऽप खूऽऽप वाट बघते मी त्यांच्या पत्राची!" आणि आता गौरीला रडू फुटलं. तिला पाठीवर थोपटत दादा म्हणाला, "ए वेडाबाई, रडतेस कशाला? तुला नक्की पत्र येणार तुझ्या लेखिकाताईंचं! त्यांनी तसे वचन दिलंय तुला..." रात्री बिछान्यावर पडल्या पडल्या गौरीला लेखिकाताईंची, त्यांच्या फोनवरच्या बोलण्याची आठवण आली. किती प्रेमाने बोलत होत्या त्या तिच्याशी! "गौरी बाळा, कितवीत आहेस तू?" त्यांचा आवाजसुद्‌धा किती गोड आणि आपुलकीने भरलेला होता. "मी सहावीत आहे, मला किनई तुमची 'भाऊबीज भेट' ही गोष्ट खूऽऽप आवडली." आपण त्यांना असं सांगितलं, त्यावर त्या म्हणाल्या, "गौरी, तू अभ्यासाच्या पुस्तकांबरोबरच अवांतर वाचन करतेस वेळ काढून, याचा मला खूप आनंद झाला बरं का? तू माझं पुस्तक वाचलंस, ते तुला आवडलं आणि हे सांगायला तू मला फोन केलास, अगं किती आनंद झाला म्हणून सांगू तुला! खूप खूप बरं वाटलं! तुझी ही वाचनाची आवड तू कायम जोपासशील हे नक्की!" त्यावर आपण म्हटलं, "लेखिकाताई, मी माझ्या दादाला सांगितलं, तुमच्या गोष्टीतल्या मुलाने जशी स्वतः मेहनत करून त्याच्या बहिणीला त्या पैशातून भाऊबीज भेट दिली, तसंच तूही स्वकमाईवर मला भेट दे भाऊबीजेला।" तर ते ऐकून त्या किती हसल्या. म्हणाल्या, "अरे वा! लगेच कृती पण करतेस तू गौरी!" आम्ही अशा कितीतरी वेळ मैत्रिणीसारख्या गप्पा करत होतो तेव्हा त्या म्हणाल्या, "गौरी, मी तुला पत्रच लिहीन एक आणि पोस्टाने पाठवीन बरं!" "अय्या! खरंच?" आपण विचारलं तर त्या म्हणाल्या, "हो! प्रॉमिस!" ... आणि ... आणि अजून त्यांचं पत्र नाही आलं ...दसरा गेला, दिवाळी गेली, नाताळही जाईल... मग मकरसंक्रांतीचा सण येईल... विचारांच्या नादात गौरीला कधी झोप लागली तिला कळलंच नाही. असेच दिवस जात होते.. पण गौरीची पत्राची प्रतीक्षा काही संपत नव्हती

नाताळची सुट्टी संपली. सुट्टीत करायला दिलेला अभ्यासही बाईंनी तपासला. मुलांना शाबासकी दिली. बाई म्हणाल्या "बरं का मुलांनो, सुट्टीतही मजा करण्याबरोबर तुम्ही रोजचा दिलेला अभ्यास व्यवस्थितपणे केलात, मला याचे खूप कौतुक वाटतं! यामुळे अभ्यासाचा रोजचा सराव राहतो." बाई बोलता बोलता वर्गातल्या सर्व मुलां-मुलींवरून नजर फिरवत होत्या. त्यांची नजर गौरीवर स्थिरावली. ती उदास वाटत होती. "गौरी, काय झालं? काही दिवस मी बघतेय, तू हिरमुली वाटतेस! मजेत असायला हवं तू बाळा..." बाईंनी मायेने विचारलं.

"बाई, बाई... तिची सगळी सुट्टी तिच्या लेखिकाताईंच्या पत्राची वाट बघण्यात गेली... कित्ती दिवस झाले, पत्रच नाही पाठवले त्यांनी!" रिचान, गौरीच्या मैत्रिणीने म्हटलं. "हो बाई! मोठे लेखक लेखिका छोट्या, लहान वाचक मुलांमुलींना कशाला पत्र लिहिणार? त्यांचा वेळ कशाला वाया घालवणार?" आर्यने रिचाच्या बोलण्यावर लगेच म्हटलं, तसा रोहितही उठून उभा राहिला, म्हणाला, "गौरीला आम्ही केव्हापासून सांगतोय की, त्या तुझ्या लेखिकाताईंनी तुला पत्र लिहिण्याचं प्रॉमिस दिलं, पण ते त्या थोडचं पाळणार आहेत? तुला त्या विसरून गेल्यात, तरीही बाई, गौरी पत्राची वाट बघतेय!" "हो

बाई, हो बाई!" आता बाकीची मुलं पण रोहितला दुजोरा देऊ लगली, "शांत व्हा मुलांनो," बाई चढ्या स्वरात म्हणाला. "गौरी... गौरी... अगं रडू नकोस." बाईंनी गौरीकडे जात म्हटलं. आता तर गौरी जोरजोरात रडू लागली. बाई म्हणाल्या, "मुलांनो, तुम्ही किती दुखावलत गौरीला! तिला धीर द्यायचा तर तुम्ही तिला रडवलंत."

इतक्यात शाळेचा शिपाई दारात आला. म्हणाला, "बाई, ही बालमासिकं आहेत जानेवारी २०२४ ची! तुमच्या वर्गासाठी दिलीत दरवेळेप्रमाणे!" बाईंनी ती बालमासिके घेतली. नंतर त्यांनी त्यातलं वरचंच असलेलं 'किशोर' बालमासिक घेऊन गौरीला हाक मारली. तिला आनंदी करण्यासाठी, तिला आधार देण्यासाठी बाईंनी म्हटलं, "गौरी, ये इथे! उभी रहा.. माझ्याजवळ! तुमच्या आवडीच्या 'किशोर' मासिकातली गोष्ट आज तू वाचून दाखव!" गौरी एकदम खूष होऊन हसली. बाईंऐवजी आज मी वाचून दाखवू गोष्ट? ती लगेच उठली. किशोरमधली 'पत्राची गंमत' या शीर्षकाची गोष्ट ती वाचू लागली.

**"प्रिय गौरी सुभाष मोहिते,**
**प्रेमळ आशीर्वाद..."**

गोष्टीत स्वतःचंच नाव वाचलं नि गौरी गोंधळली, मुलंमुलीही एकदम चकित झाली. बाई पण आश्चर्यचकित झाल्या. "वाच वाच पुढे गौरी..." बाई म्हणाल्या. गौरी वाचू लागली.

"गौरी बाळा, तू माझ्या पत्राची खूप वाट पाहिलीस, हो ना? अगं, पण तुला पत्र लिहायचं असं मी रोज म्हणत होते पण कसं कुणास ठाऊक, जमलंच नाही. हं पण म्हणून तुझी आठवण मात्र रोज येत होती. आता जाहीरपणे तुला पत्र लिहून सगळी कसर भरून काढायची असे मी ठरवलं, आवडली ना तुला माझी गंमत? आता तू तर पत्र वाचशीलच, पण तुझ्याबरोबर तुझे मित्रमैत्रिणी आणि सगळेच वाचक तुझे पत्र वाचतील. तुम्ही छोटे वाचक आम्हां लेखकांसाठी खूप खूप महत्त्वाचे आहात. उशीरा का होईना मी तुला दिलेलं प्रॉमिस पाळलं बरं हे पत्र लिहून! तू फोनवर मला माझी गोष्ट आवडली हे सांगितलंस तेव्हा मला खरंच खूप उत्साह आला अजून लेखन करायला, अगं तुम्ही छोटे वाचक आम्हांला ऊर्जा देता, तुम्ही आमची प्रेरणा आहात, तेव्हा आता छान हस बघू गौरी, आणि आता मकरसंक्रांतीचा गोड गोड तिळगूळ देते, तो घे आणि अशीच गोड बोल;

खरंच गौरी, मकरसंक्रांतीचा आपला सण म्हणजे श्रीसरस्वती देवीच्या आशीर्वादाचा, तिच्या कृपाप्राप्तीचा सण! आपली वाणी, वाचा म्हणजेच आपलं बोलणं याची शक्ती, सामर्थ्य याची महती सांगणारा सण! वाचाशक्तीचा महिमा अगाध आहे. म्हणूनच आपण नेहमी मधुर, मनाला शीतलता देणारे, आधार देणारं आणि ऐकणाऱ्याला ऊर्जा देणारं असं बोलायला हवं. आपलं बोलणं आपल्या अंतःकरणातून, खऱ्याखुऱ्या सात्विक भावनेतून उमललेलं असलं की, ते बोलणं नुसत शब्द नाही रहात बरं, ते तर चंद्रापेक्षाही शीतल होऊन मायेचे, ममतेचे स्पर्श बनतात. संक्रातीला नव्हे तर वर्षाचे ३६५ दिवस मृदू, गोड, लाघवी आणि नेमक्या शब्दांत छान संवाद साधला तर आपल्या स्वतःलाही मानसिक शांती आणि निखळ आनंद मिळतो. कुणासाठी चांगलं बोलायचं, कशासाठी नम्र व्हायचं तर सारे काही आनंदासाठीच! संत कबीरजींचा हा दोहा फार समर्पक आहे इथे! बघ हं ते काय सांगतात,

**ऐसी वाणी बोलिए मनका आपा खोए**
**औरनको शीतल करे, आपहुँ शीतल होए**

याचा अर्थ आपला मान व अहंकार बाजूला ठेवून

दुसऱ्यांशी "मधुर, गोड शब्दात बोलावं की ज्यामुळे ऐकणाऱ्याला शांत वाटतं, आनंद मिळतो, एवढंच नव्हे तर त्याबरोबर स्वतःलाही आनंदाची आणि शांतीची अनुभूती होते. शब्द काय किंवा वाणी काय जपून, विचारपूर्वकच वापरायला हवेत, हो ना गौरी? कारण आपल्या बोलण्यावर तर परस्परांमधील संबंध, नाती, मैत्री, एवढंच काय पण व्यवसाय व नोकरीतील यश आणि भविष्य अवलंबून असतं. संभाषण कलेला म्हणूनच आपल्या सर्वांच्या जीवनात स्थान आहे हे लक्षात घ्यायला हवं; असत्य, निंदा, नालस्तीयुक्त आणि कटू बोलणं वाणीची शुद्धता व सामर्थ्य कमी करतं हे खरंच! असो. गौरी, अगं आज हवेचं प्रदूषण आहे तसं अशा वाईटसाईट बोलण्याने, विषारी वाणीने ही प्रदूषण वाढतंच गं हवेतलं... वाईट विचारांचं! खरं ना? तेव्हा खरं तर आज आपण सर्वांनीच शक्यतो शाब्दिक हिंसा न करण्याचा आणि विवेकाने चांगलं, हितकारक बोलून सर्वांशी सुसंवाद साधण्याचं व्रत घेऊ, वसा घेऊ आणि तो सचोटीने पाळू!

गौरी बाळा, तुम्हां मुलांचं भविष्य अजून घडायचं आहे, त्यासाठी विचार आणि आचार चांगले असले, तो पाया भक्कम असला की त्याच्यावर सुयशाची, सत्कीर्तीची इमारत दिमाखात उभी राहणारच. तुझ्या आईबाबांना माझा मनापासून नमस्कार आणि तुझ्या दादाला अगदी प्रेमळ आशीर्वाद सांग. त्यांनाही मकरसंक्रांतीच्या मंगलदायी खूप खूप शुभेच्छा! तसंच माझ्या छोट्या मोठ्या सर्व वाचकांना मी अगदी मनापासून मकरसंक्रांतीच्या आनंददायी, आरोग्यदायी आणि सुखसमृद्धीमय शुभकामना व्यक्त करते.

**तुझीच लेखिकाताई**

गौरीचं पत्र वाचून झालं. गौरीचे डोळे आनंदाश्रूंनी भरून आले. सर्व मुलं अवाक् झाली होती. बाईंनी जवळ जाऊन गौरीला मिठीत घेतलं. त्यांच्या मनात आलं, लेखिकाताईंनी त्यांचा शब्द पाळला आणि गौरीचा माणसाच्या शब्द पाळण्यावरच्या विश्वासाला सार्थ केले.

**संपर्क – ९९२०२७१०३२**

## चिंटू

चारूहास पंडित / प्रभाकर वाडेकर



# ज्ञान ज्योत

■ संगीता बाजीराव ठुबे

उघडूनी ज्ञानाची कवाडे
केला श्रीगणेशा शिक्षणाचा
स्मरू त्या क्रांतीज्योतीला
दाखविला मार्ग जीवनाचा ||

सोसल्या अनंत अवहेलना
परि न सोडीला विचार
मोडून साऱ्या परंपरा
ध्येयपूर्ती एकच निर्धार ||

लाविली ज्योतीने ज्ञानज्योत
करुनी दूर अंध:कार
तिमिरातून तेजोमय
जाहला उष:काल ||

स्त्रियांचा तू अभिमान
वाढविला तयांचा सन्मान
पचवूनी नाना अपमान
साऊ सोबत ज्योतिबा महान ||

लावू ज्योतीसम ज्ञानदीप
स्मरू अंतरंगी इतिहास
जपू तव पाऊलखुणा
हाच अमुचा राहील ध्यास ||

संपर्क– ८३६९६६७६०३



मुकुंद टाकसाळे



# ...आणि ढोलूराम पोहायला शिकला!

**छोट्या चिन्मयला घरात आई, बाबा, त्याची थोरली ताई प्रेमानं चिनू म्हणतात. पण त्याच्यापेक्षा दोनच वर्षांनी मोठा असलेला त्याचा भाऊ सलीलदादा त्याला 'ढोल्या' म्हणतो. त्याच्या वर्गातली पोरंही त्याला 'ढोलूराम' म्हणून चिडवतात. आधी तो होताच तसा गोलमटोल. जाड्या. घरी बसून नुसते लाडू खायचे हा त्याचा आवडता उद्योग. बेसनाचे, बुंदीचे, डिंकाचे, रव्याचे अगदी राजगिऱ्याचे लाडू आणि जेवणात बासुंदी, श्रीखंड चापून खाणारा हा ढोलूराम मिसळ, दाबेली, भजी, इडली, मसाला डोसा, केक आणि आइसक्रीमचा फडशा पाडायचा. पण हळूहळू तो बदलला. अशा या हसऱ्या, निश्चयी आणि आजूबाजूच्या सर्व गोष्टींबद्दल कुतूहल असणाऱ्या मुलाच्या करामती आणि गमतीजमती 'ढोलूराम' या नियमित सदरातून आपल्यापर्यंत पोहचवणार आहेत प्रसिद्ध विनोदी लेखक मुकुंद टाकसाळे..**



# ढोलूराम

मुलांना एकमेकांना चिडवायला आवडतं. तो त्यांचा आवडता छंदच असतो म्हणा ना. काळ्या रंगाच्या मुलाला कोळश्या म्हणायचं , चष्मेवाल्या मुलाला ढापण्या म्हणायचं, हडकुळ्या मुलीला उदबत्ती म्हणायचं.... खरं तर तुम्हांला उदाहरण द्यायची काहीच आवश्यकता नाही. तुम्ही वर्गातल्या कुणाकुणाला काय चिडवता ते जरा आठवून पाहा बघू.

खरं तर एखाद्याच्या शारीरिक व्यंगावरून चिडवणं हे अगदी चुकीचं आहे. कुण्या मुलाला लंगड्या म्हणणं, चकण्या म्हणणं, ढापण्या म्हणणं, रंगाची ग्यारंटी आहे, असं म्हणणं... हे बरोबर नाहीच. ज्यांना आपण चिडवतो, त्यांना किती वाईट वाटत असेल, याचा आपण कधी विचार करतो का?

छोट्या चिन्मयला घरात आई, बाबा, त्याची थोरली ताई प्रेमानं चिनू म्हणायची. पण त्याच्यापेक्षा दोनच वर्षांनी मोठा असलेला त्याचा भाऊ – सलील – त्याला 'ढोल्या' म्हणायचा. त्याच्या वर्गातली पोरंही त्याला 'ढोलूराम' म्हणून चिडवायची. चिनूला त्याचं वाईट वाटायचं, कुणी फार चिडवलं तर कधी कधी रडूही यायचं.

पण करणार काय? तो होताच तसा गोलमटोल. त्याचं चित्र काढायचं तर अगदी सोपं होतं. नुसते गोल गोल काढायचे. त्याला खेळाची आवड नव्हती. घरी बसून नुसते लाडू खायचे हा त्याचा आवडता उद्योग. त्याला बेसनाचे, बुंदीचे, डिंकाचे, रव्याचे अगदी राजगिऱ्याचेही लाडू खूप खूप आवडायचे. झालंच तर जेवणात बासुंदी, श्रीखंड असेल तर तो चापून जेवायचा. अगदी आडवा हात मारायचा. आणि कुणाचा वाढदिवस असला की केक चापायला आणि आइसक्रीम खायला हा सर्वांत पुढं. घरात सर्वात धाकटा असल्यानं आई त्याचे लाडही खूप करायची. त्यामुळे त्याच्या पोटाचा ढोल दिवसेंदिवस वाढतच चालला होता.

"ढोल्या, जरा कमी खा. व्यायाम कर," त्याचा सलीलदादा त्याला चिडवायचा. सलीलदादा त्याच्यापेक्षा दोनच वर्षांनी मोठा होता. तो असं म्हटला की मग त्यांच्यात बॉक्सिंग व्हायची. आणि शेवट चिनूच्या रडण्यानं व्हायचा. मग आई तरतरा येऊन सलीलदादाला रागवायची.

एकदा मे महिन्याच्या सुट्टीत तो आपल्या आजोळी गेला. बरोबर सलीलही होता. आजोळी हुंदडायला, दांडगाई करायला त्याला फार आवडायचं. एकदा त्याच्या आजोबांनी घरातल्या मावस, मामे भावंडांबरोबर त्याला कॅनॉलवर पोहायला नेलं.

कॅनॉलवर गावातली लहानमोठी पोरं मोठ्या उत्साहात पोहायला आली होती. भुताच्या गोष्टींना



घाबरणारा शेजारचा दत्तू इथं मात्र भोपळा लावून धडाधड पाण्यात उड्या मारत होता. तशीच त्याची बहीण सईही. तीही झाशीची राणी असल्याचा थाटात भोपळा पाठीशी बांधून पाण्यात उड्या मारत होती. मुलांचा मजेशीर गलका चालू होता.

आजोबांनी चिनूच्या पाठीला भोपळा बांधला. आता चिनू आतून चांगलाच टरकला होता. यापूर्वी तो पाण्यात कधीच उतरला नव्हता. तो अंग आक्रसून घेऊन काठावरच थांबला होता. “याला भोपळा कशाला बांधलात आजोबा? त्याचं अंग म्हणजेच

एक मोठ्ठा भोपळा आहे, हा पाण्यात आपोआप तरंगेल. " एक टारगट पोरगा जोरात ओरडला. त्यावर सारी पोरं जोरात हसली. जोरजोरात "ढोलूराम, मार उडी. ढोलूराम, मार उडी" असं ओरडू लागली.

चिनूला रडायला यायला लागलं. उघड्या पाठीला भोपळा बांधला असताना तो तसाच घराकडे धावत सुटला. तो पुढे आणि आजोबा त्याच्या मागे. " अरे चिनू, थांब थांब," आजोबा जोरात ओरडत होते आणि चिनू रडत रडत पळत होता. तो थांबला ते थेट घरी जाऊनच.

आजोबा चिडले होते. त्याच्यावर ते ओरडले, "पळतोस कशाला?"

"मग मला मुलं का चिडवतात?" त्यानं रडत तक्रार केली.

"चिडवतात तर चिडवू दे. तुझ्या अंगाला थोडीच भोकं पडताहेत? तू जितका चिडशील तितकी ती पोरं तुला आणखी चिडवतील. आणि तू पोहायला लागलास तर कदाचित बारीकही होशील. मग ते तुला 'ढोलूराम' कसं चिडवतील?" आणि आजोबा पुढं त्याला म्हणाले, "उद्या तुझे असले लाड मी चालवून घेणार नाही. लक्षात ठेव. या सुट्टीत तुला इतर मुलांप्रमाणेच पोहायला आलं पाहिजे, काय?"

चिनूनं निमूटपणे मान हलवली. आजचं मरण उद्यावर गेलं या आनंदात त्यानं आजीकडून बेसनाचा लाडू घेऊन त्याचा फडशा पाडला आणि पोहण्याच्याच चड्डीला हात पुसले.

दुसऱ्या दिवशी कॅनॉलवर चिनूनं रडारड करूनही आजोबांनी त्याला भोपळा बांधला आणि ते स्वतः त्याच्यासह पाण्यात उतरले. तो घाबरला होता. आजोबांच्या गळ्याला गच्च मिठी मारून रडत होता.

"आता रडायला काय झालं?" आजोबांनी त्याला विचारलं.

"सगळी मुलं मला पाण्यात पाहताहेत," तो रडवेल्या आवाजात म्हणाला.

"तुझं मराठीचं ज्ञान आत्ता पाजळू नकोस. कुणी तुला पाण्यात पाहत बसलेलं नाही. आणि माझा गळा आवळू नकोस." आजोबा म्हणाले.

हळूहळू त्याची पाण्याची भीती गेली. मग मजाही वाटायला लागली. त्यामुळे इतर मुलांचं चिडवणं त्यानं मनावरच घेतलं नाही. काही दिवसांतच तो आनंदानं पाण्यात हात पाय मारू लागला. त्याच्या अंगाभोवतीची चरबी कमी होऊन तो बाकीच्या मुलांपेक्षा थोडाच लठ्ठ दिसू लागला. पण तरीही मुलं त्याला 'ढोलूराम' म्हणायची. पण आता तोही ते हसून घ्यायचा. बिलकूल चिडायचा नाही.


आजोळहून तो जेव्हा परत पुण्याला त्याच्या घरी आला तेव्हा त्याचे आई-बाबा त्याला बघून चकीत झाले. त्याचा गोल आकार बऱ्यापैकी उभट झाला होता. आता त्याला पोहोण्याची इतकी काही गोडी लागली की पुण्यात तो टिळक तलावात रोज पोहायला जाऊ लागला. पोहोण्याचे जाधवसर जे शिकवायचे, ते मनापासून शिकू लागला. थंडीतसुद्धा त्याला पोहायला जायला आवडू लागलं.

आणि एक दिवस तर तो आंतरशालेय पोहोण्याच्या स्पर्धेत तिसरा आला. त्याच्या शरीरावरची अनावश्यक चरबी नष्ट होऊन तो काटक दिसू लागला. तरी सवयीने त्याच्या वर्गातली पोरं त्याला 'ढोलूराम'च म्हणत राहिली. पण आता चिनू ते अजिबातच मनावर घ्यायचा नाही. कुणी तसं म्हटलं की गालातल्या गालात हसायचा.

**संपर्क : ९८५०८१७२१०**

मोगल जाधव

# राजमाता जिजाऊ



बुलढाणा जिल्ह्यातील सिंदखेडराजा येथील मातब्बर सरदार लखुजीराव जाधव यांच्या कन्या जिजाबाई. जिजाऊंच्या आईचे नाव म्हाळसाबाई होते. त्यांना दत्ताजी, अचलोजी, बहादुरजी, रघोजी हे चार भाऊ होते, जिजाबाईंचा जन्म १२ जानेवारी १५९८ रोजी झाला. जिजाऊंच्या जन्माच्यावेळी त्यांच्या वडलांना म्हणजे लखुजीरावांना खूप आनंद झाला, त्यांनी त्या वेळी हत्तीवरून लोकांना साखर वाटली. जिजाऊंना लहानपणापासूनच राजकारणाचे व युद्धनीतीचे बाळकडू मिळाले होते. प्रत्यक्ष रणांगणावर जाऊन शत्रूशी लढण्यासाठी आवश्यक असलेली शस्त्रास्त्रे चालवण्याचे शिक्षणही त्यांनी प्राप्त करून घेतले होते.

जिजाऊंचा विवाह वेरूळ गावचे पाटील मालोजीराजे भोसले यांचे पुत्र शाहजीराजे यांच्याबरोबर झाला. जिजाऊंना सहा पुत्र झाले, त्यांच्यापैकी संभाजी व शिवाजी हे दोघेच जगले. बाकी चार पुत्र लहानपणीच वारले. आदिलशाहाने शाहजीराजांना कर्नाटक राज्यातील प्रदेश जिंकण्यासाठी पाठवले. सोबत जिजाऊ व शिवराय होते. तेथे जिजाऊ व शाहजीराजांनी शिवरायांच्या शिक्षणाची व्यवस्था केली. पुढे शाहजीराजांनी जिजाऊ व शिवराय यांना पुणे जहागिरीकडे पाठवले. पुण्याला आल्यावर सुरुवातीच्या काळात जिजाऊंनी स्वतः राज्यकारभार पाहिला. जिजाऊ आणि शिवराय कर्नाटकातून पुण्याला आले त्या वेळी पुण्यांची अवस्था फार दयनीय झाली होती. शाहजीराजांच्या शत्रूंनी पुणे हे गाव उजाड करून टाकले होते. शत्रूच्या भीतीने गावातील लोक गाव सोडून पळून गेले होते. शेते उजाड व ओसाड झाली होती. जंगल वाढले होते. जिजाऊ व शिवराय पुण्यात 'लाल महाल' या वाड्यात राहू लागले. हे आसपासच्या गावांतील लोकांना समजले तेव्हा लोकांना मोठा धीर आला. जिजाऊंनी लोकांना धीर दिला.

जिजाऊ किती धाडसी व पराक्रमी होत्या या विषयीचा एक प्रसंग आहे. हा प्रसंग म्हणजे, अफजलखानाच्या वधानंतर शिवाजी महाराजांनी आदिलशहाच्या ताब्यातील पन्हाळगड जिंकला. त्यामुळे आदिलशाह खूपच संतापला. त्याने शिवरायांचा बीमोड करण्यासाठी सिद्दी जौहर या सरदाराला स्वराज्यावर पाठवले. त्याच्याबरोबर फाजलखानही बापाच्या वधाचा सूड घेण्यासाठी निघाला. या वेळी शिवाजी महाराज पन्हाळगडावर होते. सिद्दी जौहरने पन्हाळगडाला वेढा दिला, त्याने गडावरील येण्याजाण्याचे सर्व मार्ग बंद केले. पावसाळ्याचे दिवस जवळ आले होते. पावसाळा सुरू झाला की सिद्दी जौहर वेढा उठवील असे शिवरायांना वाटले. मात्र पावसाळा सुरू होताच सिद्दीने वेढा अधिकच कडक केला. चार महिन्यांपासून शिवाजी महाराज पन्हाळगडावर अडकून पडले होते. स्वराज्याचे सेनापती नेतोजी पालकर व घोडदळाचे प्रमुख सिद्दी हिलाल यांनी पन्हाळगडाचा वेढा उठवण्यासाठी आदिशाहाची राजधानी विजापूरवर स्वारी केली. नाक दाबले की तोंड उघडेल, स्वतःच्या राजधानींवर हल्ला झाल्यावर सिद्दी जौहर पन्हाळगडाचा वेढा उठवेल अशी नेतोजी पालकरची राजनीती होती. मात्र सिद्दी जौहरने पन्हाळगडाचा वेढा उठवला नाही.

चार महिन्यांपासून शिवाजी महाराज पन्हाळगडाच्या वेढ्यात अडकल्यामुळे जिजाऊ बैचेन झाल्या होत्या. त्यांनी स्वतःच पन्हाळगडावर चालून जाऊन शिवाजी महाराजांना वेढ्यातून सोडवून आणण्याची तयारी केली. जिजाऊंनी राजगडावरील सर्व सैन्य जमा केले. त्या स्वतः शस्त्रसज्ज होऊन पन्हाळगडाकडे निघाल्या, त्याच वेळी नेतोजी पालकर व सिद्दी हिलाल विजापूरहून राजगडावर परत आले. नेतोजी पालकरांना बघताच जिजाऊ रागाने म्हणाल्या, "माझा पुत्र तिकडे शत्रूच्या वेढ्यात अडकून पडला आहे आणि तुम्ही त्या धन्यास सोडून




इथे आलात, आता मीच जाते व जौहरचे मुंडके कापून आणते. तुम्ही शत्रूशी लढा किंवा लढू नका, मी मात्र निघाले आता." जिजाऊंचे हे म्हणणे ऐकून नेतोजी पालकर लागलीच सिद्दी जौहरचा वेढा उठवण्याच्या कामगिरीवर गेले. त्यांनी जिजाऊंना पन्हाळगडाच्या मोहिमेपासून परावृत्त केले.

पन्हाळगडच्या वेढ्यातून शिवराय युक्तीने निसटले. या प्रसंगी शिवा काशिदने आत्मबलिदान केले. तर बाजीप्रभू देशपांडे, फुलाजी देशपांडे, शंभूसिंह जाधव, बाजी बांदल आदी शूरवीर सिद्दी जौहरच्या सैन्याशी लढताना पावनखिंडीत धारातीर्थी पडले.

जिजाऊंचे आयुष्य अडचणींनी, संकटांनी भरलेले होते. त्यांनी अतिशय प्रतिकूल परिस्थितीत शिवरायांच्या कर्तृत्वाला खतपाणी घातले. प्रत्यक्ष रणांगणावर जाऊन शत्रूशी लढण्यासाठी आवश्यक असलेली शस्त्रास्त्रे चालवण्याचे प्रावीण्य आणि मनोधैर्य त्यांच्याकडे होते. त्यांनी अत्यंत कुशलपणे काही काळ स्वराज्याचा कारभार केला. पुणे जहागिरीचा विकास केला. त्यांनी कसबापेठ गणपती मंदिराची स्थापना केली. तांबडी जोगेश्वरी मंदिराचा जीर्णोद्धार केला. शाहजीराजे कर्नाटकात वास्तव्यास होते त्यामुळे जिजाऊंनी शिवरायांच्या आई व वडलांची जबाबदारी योग्यरीतीने पार पाडली. जिजाऊंनी शिवरायांना योग्य शिक्षण व प्रोत्साहन देऊन शिवरायांकडून स्वराज्य स्थापन केले.

शिवरायांवर जिजाऊंच्या कार्याचा खूपच प्रभाव पडलेला होता. शिवाजी महाराज वेळ प्रसंगी जिजाऊंचा सल्ला घेत असत व जिजाऊंनी दिलेला सल्ला मानत असत. जिजाऊंचे स्वराज्यातील सर्व कारभाऱ्यांवर बारीक लक्ष असे. त्या केवळ शिवरायांच्या आई नव्हत्या तर त्यांची स्फूर्ती होती, मार्गदर्शिका होत्या. ६ जून १६७४ रोजी शिवरायांनी स्वतःला राज्याभिषेक करवून घेतला. सिंहासनावर बसण्याअगोदर शिवाजी महाराजांनी जिजाऊंचा आशीर्वाद घेतला. राज्याभिषेकाचा प्रसंग पाहून मातोश्री जिजाऊंच्या डोळ्यांचे पारणे फिटले. त्यांच्या डोळ्यांतून आनंदाश्रू वाहू लागले. जिजाऊंचे सकल मनोरथ पूर्ण झाले. राज्याभिषेकानंतर अल्पावधीतच १७ जून १६७४ रोजी मातोश्री जिजाऊंचे पाचाड (जिल्हा रायगड) येथे निधन झाले.

**संपर्क – ९६७३०९५७९६**



# संक्रांतीचा सण

■ सुचित्रा पवार



पावटा न घाट्यांची
चव लज्जतदार
बोरं न् गाजरं
लाल चटकदार

उसाचे गरे
गोड रसदार
गव्हाच्या ओंब्या
हिरव्या हिरव्यागार



बाजरीच्या भाकरीची
चवच न्यारी
जवसाची चटणी
आरोग्याला भारी

लोण्याचा गोळा
शुभ्र मऊ मऊ
राळ्याचा भात
दह्यासंगे खाऊ


तीळ आणि गूळ
चवीला मस्त
गोड गोड लाडू
करूया फस्त

संक्रांतीचा सण हा
आला आला
पतंग उडवू
चला चला

संपर्क– ९५६१०७०८०६

सध्याचे युग हे विज्ञान आणि तंत्रज्ञानाचे आहे. त्यामुळे विज्ञान हा विषय केवळ परीक्षेसाठी शिकून चालणार नाही. विज्ञानाचा उपयोग आपल्याला दैनंदिन जीवनातही करता यायला हवा. हा उपयोग करण्यासाठी विज्ञान विषय मुळापासून समजून घेणे गरजेचे आहे आणि त्याकरिता विज्ञानाशी मैत्री करायलाच हवी. आणि म्हणूनच 'एक ओवी विज्ञानाची' या नियमित सदरातून आपल्या लोकजीवनाचा भाग असलेल्या सहज–सोप्या ओव्यांच्या माध्यमातून, तुम्हां–आम्हां–सर्वांची विज्ञानाशी मैत्री करून देत आहेत जैवभौतिकशास्त्र आणि वैद्यकीय भौतिकशास्त्र या विषयांचे अभ्यासक, प्रसिद्ध विज्ञानलेखन आणि नांदेड येथील स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे माजी कुलगुरू **प्रा. डॉ. पंडित विद्यासागर**.

# विज्ञानाशी मैत्री



# ओवी एक विज्ञानाची

मित्रांनो, विज्ञानाची आणि तुमची ओळख झाली आहेच. पण ती ओळख झाली आहे पाठ्यपुस्तकातून. आपण आता ही ओळख निराळ्या प्रकारे करून घेणार आहोत. त्याची सुरुवात आपण या सदराच्या मथळ्यापासूनच केली आहे. यात ओवी आणि विज्ञान हे दोन शब्द आहेत. तुमच्या मनात साहजिकच विचार आला असेल की ओवी आणि विज्ञानाचा काय संबंध? ओवी तर साहित्याचा भाग आहे. प्रथम आपण याच प्रश्नाचे उत्तर शोधू. ओवी हा आपल्या लोकजीवनाचा भाग आहे. पूर्वी स्त्रिया जात्यावर दळण दळताना ओव्या गात. त्यात त्या आपल्या भावना सहजसुंदर रीतीने व्यक्त करत. हीच सहजता विज्ञानामध्ये आली तर? मजा येईल नाही? आपण मित्रांशी बोलतो त्या वेळी आपल्या मनावर कुठलेही दडपण नसते. मित्रांशी बोलताना गप्पा, गाणी आणि गोष्टी या सगळ्यांचाच समावेश असतो. आपल्याला आता विज्ञानाशी मैत्री करायची आहे. अर्थातच त्यात गप्पा, गाणी आणि गोष्टी असणार आहेत. तुम्हांला माहीत आहे का, संत तुकाराम आणि संत ज्ञानेश्वर यांनी अवघड गोष्टी सोप्या करून सांगितल्या. संत तुकारामांची पद्धत अतिशय सोपी परंतु मनाला भिडणारी होती. त्यांची अभंग रचना खूपच परिणामकारी आहे. त्यांचे वर्णन पुढीलप्रमाणे करता येईल.

**तुकोबांची रसाळ वाणी अभंगांची रचिली लेणी**
**साधेपणी भाव ठेऊनी ज्ञान महा वर्णिले**

तर ज्ञानेश्वरांनी शब्दांचा वापर खूपच सुंदर रीतीने केला आहे. कसा ते पहा.

**ज्ञानियाचे थोरपण शब्दांमागे धावे ज्ञान**
**गुढार्थाचे नवनीतकण सहजपणे वेचले**

विज्ञानाची मैत्री करताना या दोन्ही गोष्टींची आपल्याला गरज पडणार आहे. तुम्ही म्हणाल हे ठीक आहे पण विज्ञानाची ओळख पुनः का करून घ्यायची? याचे कारण, विज्ञान केवळ परीक्षेसाठी शिकून चालणार नाही. सध्याचे युग हे विज्ञान आणि तंत्रज्ञानाचे युग आहे. त्यामुळे विज्ञानाचा उपयोग दैनंदिन जीवनातही करता यायला हवा. अन्यथा आपली गत ही गोष्टीतल्या सिंहासारखी होईल. ही गोष्ट आपण विज्ञानाच्या अंगाने पाहू.

जंगलातील एका सिंहाने असे फर्मान काढले की उद्यापासून रोज एका प्राण्याने त्याच्याकडे यायचे. तो त्या प्राण्याची शिकार करून आपली भूक भागवील. सर्व प्राणी भयभीत झाले. उद्या कुणी सिंहाकडे जायचे यावर विचार सुरू झाला. कुणीच जायला तयार नव्हते. सर्वांनाच आपला जीव प्यारा होता. तेवढ्यात एक ससा सिंहाकडे जायला तयार झाला. सर्वांना खूप आश्चर्य वाटले. सशामुळे त्यांचा जीव वाचला होता. त्यामुळे ते खूश होते. आरशाप्रमाणे पाण्यात प्रतिबिंब दिसते हे सशाला माहीत होते. ससा मुद्दामच उशिरा सिंहाकडे गेला. त्याला उशिरा आलेला पाहून सिंह खूपच रागावला. "काय रे, इतक्या उशिरा का आलास?", सिंहाने रागाने विचारले. "काय सांगू महाराज? मी येत असताना दुसऱ्या सिंहाने मला अडवले. मी त्याला सांगत होतो की मला उशीर होतोय. पण तो म्हणाला, "मीच जंगलाचा राजा आहे." हे ऐकल्यानंतर सिंहाचा पारा आणखीनच चढला. तो रागाने म्हणाला, "चल, दाखव मला कुठे आहे तो सिंह?" ससा तयारच होता. तो सिंहाला घेऊन एका विहिरीपाशी आला. दुसरा सिंह तुम्हांला घाबरून विहिरीत लपला आहे असे सांगितले. सिंहाने विहिरीच्या काठावर चढून आत डोकावले. तर त्याला दुसरा सिंह दिसला. त्याने रागाने डरकाळी फोडली. पाण्यातील सिंहाने त्याचे अनुकरण केले. आपला प्रतिस्पर्धी आव्हान देत आहे असे समजून सिंहाने त्याच्यावर झेप घेतली आणि तो विहिरीत पडला, त्याला विज्ञान माहीत असते तर, आरशात प्रतिबिंब पडते तसेच ते पाण्यातही पडते, हे त्याला माहीत असते. प्रतिबिंब पडल्यास उजवी आणि डावी बाजू यांची अदलाबदल होते. आपला उजवा हात हा प्रतिबिंबाचा डावा हात असतो. सिंहाने आपला उजवा कान हलवून प्रतिबिंबाचा डावा का हलतो हे पाहिले असते तर तो फसला नसता.

ससा मात्र हुशार निघाला. त्याला प्रतिबिंब कसे दिसते हे माहीत होते. त्याने आपल्या ज्ञानाचा उपयोग करून आपला आणि इतर प्राण्यांचा जीव वाचवला. आपणही विज्ञानाची ओळख करून असेच हुशार होऊया. तर आता भेटूया पुढील भागात.


**संपर्क – ९४२०४८३४८७**

## चला चित्र रंगवूया...!!!

धनश्री केळकर

**नमस्कार मित्र मैत्रिणींनो!**

**आपण या सदरामध्ये रंगांची माहिती करून घेणार आहोत. ज्याला आपण रंगशास्त्र असे म्हणू...तर या रंगांचा पाया म्हणजे 'प्राथमिक रंग'. त्यांची नावे म्हणजे निळा, पिवळा आणि लाल... ते कोणत्याही रंगांच्या मिश्रणाशिवाय बनतात, म्हणून त्यांना, 'मूळ रंग' असेही म्हणतात. तुम्हांला जो आकाशात उंच उडणारा पतंग दिसतो आहे ना, तो तुम्हांला या तिन्ही रंगांनी रंगवायचा आहे, ते रंग मूळ स्वरूपात आहेत तसे वापरायचे आहेत... चला तर मग, तेली खडूंनी हे चित्र रंगवूया...!!!**



*मुळ कथा - रस्किन बॉण्ड*

**अनुवाद : माधुरी दीक्षित**

**मित्रमैत्रिणींनो,**

**या सदरात आपण गोष्टी हुडकायला जाणार आहोत. जगात खूप छान छान गोष्टी आहेत, पण आपल्याला ती भाषा येत नसेल तर त्यांचा आनंद घेता येत नाही. म्हणून तुमच्यापर्यंत  त्यातल्या काही निवडक गोष्टी भाषांतर करून आम्ही पोचवणार आहोत. या गोष्टी तुम्हांला कधी गुदगुल्या करतील, कधी रडवतील, कधी मोठ्ठं शहाणपण शिकवतील तर कधी हसवतील. तुम्हांला त्या आवडल्या का, ते आम्हांला जरूर कळवा.**

# बोगदा



दुपारची वेळ होती आणि जंगल अगदी स्तब्ध, शांत होतं. उंच उंच हिरव्यागार झाडांमधून जाणाऱ्या रस्त्याला एके ठिकाणी रेल्वेरुळांनी छेदलं होतं. गरम हवेच्या झळा रुळांवर मृगजळासारख्या चमकत होत्या. रेल्वेचे दोन रूळ म्हणजे दोन सरळसोट काळे साप दिसत होते. डोंगरातल्या बोगद्यात घुसलेले. सूरज त्या क्रॉसपाशी दुपारच्या ट्रेनची वाट पाहत उभा होता. ते खरंतर स्टेशन नव्हतं आणि त्याला काही गाडी पकडायची नव्हती. तो बोगद्यातून गर्जत येणाऱ्या वाफेच्या इंजिनाला पाहायला तिथं उभा होता. देहेऱ्यावरून जंगलाच्या रस्त्यानं सायकल हाणत तो एका छोट्या गावापर्यंत आला होता. सायकल तिथं सोडून, झुडपांनी भरलेलं एक टेकाड चढून तो बोगद्याच्या तोंडाशी येऊन थांबला होता. त्यानं वर पाहिलं. इंजिनाची कर्कश शिट्टी दुरून त्याच्या कानावर पडली. त्याला दिसलं काहीच नाही कारण, ट्रेन डोंगराच्या दुसऱ्या बाजूनं येत होती. एवढ्यात बोगद्यातून दूरवर ढग गडगडल्यागत आवाज येऊ लागला, आणि ट्रेन येतेय, हे त्याला कळलं. एक-दोन क्षणांत वाफेचं इंजिन बोगद्यातून सूरजच्या स्वप्नातल्या एखाद्या शेवाळी, काळ्या, सोनेरी ड्रॅगनसारखं कानां-नाकातून वाफेचे लोट सोडत, फसफसत, भस्सकन बाहेर आलं. डाव्या-उजव्या बाजूंना ठिणग्यांची उधळण करत त्यानं जंगलाला जणू आव्हान दिलं. सूरज आपसूक काही पावलं मागं सरकला. गरम वाफेच्या लाटा त्याच्या तोंडावर आदळल्या. झाडंसुद्धा त्या आवाजानं आणि उष्णतेनं अंग चोरती झाली. उंच उंच शिसवीच्या झाडांना वाफेचा पिसारा बहाल करत ट्रेन निघून गेली. जंगल पुन्हा स्तब्ध झालं. आता काही म्हणजे काही हलत नव्हतं. वाफेच्या निघून जाणाऱ्या लाटा बघत बसलेला सूरज निघाला आणि बोगद्याच्या दिशेनं चालू लागला. बोगदा आत अजून अंधारा होत गेला. वीसेक यार्डापर्यंत गेल्यावर डोळ्यांत बोट घातलं तरी काही दिसेना. मागे वळून बाहेर अजून दिवसाचा उजेड असल्याची खात्री सूरजला करून घ्यावी लागली. समोर फक्त एक उजेडाचं छोटं वर्तुळ दिसत होतं. बोगद्यात अजून ट्रेनचा धूर भरलेला होता. पुढची ट्रेन यायला अजून अनेक तास लागणार होते. तोपर्यंत रुळांनी काटलेला रस्ता जंगलाच्या मालकीचा होता.

सूरज बोगद्यात रेंगाळला नाही, आता तिथं काही करण्याजोगं किंवा बघण्याजोगं नव्हतं. बोगदा आतून कसा असतो हे बघायला त्याला नुसतं बोगद्यातून चालत जायचं होतं. बोगद्याच्या भिंती ओलसर आणि चिकट होत्या. एक वटवाघूळ त्याच्या डोक्यावरून उडत गेलं. एक सरडा रुळांच्या मधोमध धावत गेला. गडद अंधारातून थेट उजेडात आल्याबरोबर त्या भक्क प्रकाशानं सूरजचे डोळे दिपले. त्यानं डोळ्यावर हात धरला. झाडांनी भरलेल्या डोंगरकड्यांकडे त्याचं लक्ष गेलं आणि काहीतरी हालचाल त्याला तिथे जाणवली. एक केशरी आणि सोनेरी रंगाचा पट्टा तिथं चमकला होता आणि मागोमाग एक लांबसडक शेपटी वळणावळणानं गेली होती. त्या झाडांमध्ये ते 'काहीतरी' एक-दोन क्षण रेंगाळलं आणि नंतर कुठं गायब झालं काय माहीत! बोगद्याच्या तोंडाशी साधारण पंधरा मीटरवर रखवालदाराची झोपडी होती. झोपडीपुढे झेंडूची

फुलं फुलली होती, आणि मागच्या बाजूला एक छोटा भाजीपाल्याचा वाफा लावलेला होता. बोगद्याची तपासणी करणं आणि त्यात काही अडथळा न येऊ देणं हे त्या रखवालदाराचं काम होतं. दर दिवशी ट्रेन येण्याच्या आधी तो बोगद्याची चालून पाहणी करायचा. सगळं ठीक असल्याची खात्री करून त्याच्या झोपडीत डुलकी घ्यायचा. जर काही गडबड आढळली, तर रुळांवरून उलट्या दिशेनं चालून तो गाडीला लाल झंडी दाखवायचा, आणि गाडी धीमी व्हायची. रात्री दिवा लावून बोगद्याची तपासणी व्हायची. बोगद्यात एखादं साळींदर वगैरे दिसलं तर अर्थात तो काही ट्रेन थांबवायचा नाही. पण गाडीला काही धोका असला तर मात्र दिव्याचा इशारा द्यायचा. आणि सगळं ठीक असलं की दिवा झोपडीच्या दारावर टांगून तो झोपी जायचा. दुपारच्या डुलकीसाठी तो खाटेवर टेकला तेवढ्यात त्याला बोगद्यातून हा पोरगा येताना दिसला. सूरज एक मीटरभर अंतरावर येईपर्यंत त्यानं वाट पाहिली आणि नंतर म्हणाला, “ये रे, ये. माझ्याकडं फारसं कुणी येत नाही. बस थोडा वेळ. मला सांग, तू माझ्या बोगद्याची तपासणी का करतो आहेस ?”

“हा तुमचा बोगदा आहे ?” सूरजने विचारलं.

“होय की. माझाच आहे. दुसऱ्या कुणाला त्याच्याशी काय काम? मीच तो सरकारला उधार दिलाय.” वॉचमन म्हणाला. सूरज त्याच्या खाटेवर टेकला.

“मला बोगद्यातून ट्रेन बाहेर येताना बघायची होती. आणि ती गेल्यावर मला वाटलं की जरा बोगदा आतून बघावा.”




“मग काय दिसलं तुला आत ?”

“काही नाही. इतका अंधार होता तिथं. पण मी जेव्हा बाहेर निघालो ना, तेव्हा मला एक प्राणी दिसला – तिथं डोंगरावर – इतका पटकन गेला तो, की काय माहीत खरंच काही दिसलं की नाही.”

“अरे तू बिबट्या पाहिलास – माझा बिबट्या.” वॉचमन म्हणाला.

“तुमच्याकडं बिबट्या आहे ?”

“हो.”

“ आणि तुम्ही तो सरकारला उधार देता ?”

“नाही, नाही.”

“धोकादायक आहे तो ?”

“नाही. तो आपल्याआपल्या कामात असतो. महिन्यातनं काही दिवस इकडं येतो.”

“तुम्ही इथं खूप दिवस आहात का ?”

“अरे किती वर्षं झाली आता. माझं नाव सुंदर सिंह आहे.”

“माझं सूरज.”

“दिवसा एक गाडी येते आणि रात्री एक. रात्रीची गाडी बोगद्यातून येताना पाहिलीस का तू ?”

“नाही. कधी येते ती ?”

“जर लेट नाही झाली तर साधारण नऊ वाजता. तुला हवं तर ये आणि इथं माझ्याबरोबर बैस.

गाडी गेली की झोपण्याआधी तुला घरी सोडीन मी."

"मी घरी विचारतो." सूरज उत्तरला. "नीट जाता येईल ना?"

"हो रे. गावातल्यापेक्षा इथं जंगलात अधिक सुरक्षित आहे. मला काही होत नाही इथं. उलट मागच्या महिन्यात मी गावात गेलो होतो तेव्हा एक बस माझ्या अंगावर आली होती."

सुंदरसिंहानं जांभई दिली आणि तो खाटेवर पसरला. "मित्रा, आता झोपतो मी. असल्या गरमीत दुसरं काही करण्याजोगं नाही."

"सगळे दुपारी झोपतात," सूरजने तक्रारीच्या स्वरात म्हटलं, "माझे बाबापण जेवलं की झोपतात."

"अरे, जनावरंसुद्धा दुपारी विश्रांती घेतात. फक्त पोरं झोपू शकत नाहीत, किंवा झोपत नाहीत म्हण."

सुंदरसिंहानं माशा मारण्यासाठी तोंडावर केळीचं मोठ्ठं पान ठेवलं, आणि थोड्याच वेळात तो बारीक घोरू लागला. सूरज उठला, रुळांकडे खालीवर बघत त्यानं गावाची वाट धरली. दुसऱ्या दिवशी, संध्याकाळच्या वेळी, झाडांतून जेव्हा कोल्हे अलगद बाहेर पडतात, तेव्हा सूरज रखवालदाराच्या झोपडीकडं निघाला. दिवसभर उकडत होतं. पण आता जमीन थंड होत होती. झाडांमधून हलका वारा वाहत होता. त्याच्यावर स्वार होत आंब्याच्या मोहोराचा सुगंध दरवळत होता, येणाऱ्या पाऊसकाळाचं वचन देत. सुंदरसिंह त्याची वाट पाहत होता. त्यानं बागेला नुकतंच पाणी घातलं होतं, फुलं कशी गार गार आणि ताजी दिसत होती. रॉकेलच्या छोट्या



स्टोव्हवर चहाचं आधण उकळत होतं.

"मी चहा टाकलाय. गाडीची वाट पाहता पाहता चहा पिण्याची मजा काही औरच." तो म्हणाला.

सुगरण पक्ष्याचं तीव्र स्वरातलं गाणं आणि सानबायांचा कलकलाट ऐकत ऐकत दोघं चहा प्यायले. हळूहळू संधीप्रकाश निवत गेला तसे बरेच पक्षी गप्प झाले. सुंदर सिंहानं त्याचा दिवा पेटवला, आणि 'बोगद्याची तपासणी करण्याची वेळ झाली', असं म्हणून तो बोगद्याकडं निघून गेला. सूरज खाटेवर बसून चहा पीत होता. अंधारात झाडं आणखी जवळ आल्यागत वाटत होती. वाऱ्याच्या झुळकी जंगलाच्या रात्रीच्या वहिवाटीची सूचना देत होत्या. हरणाचं खाकरणं, कोल्हेकुई, रातव्याचा विचित्र टौंक- टौंक आवाज. काही आवाज सूरजच्या ओळखीचे नव्हते. झाडांतून येणारे कुरकुर, कुचकुच आणि कुजबुजीसारखे आवाज.. जणू काही झाडं हातपाय ताणत, बोटं मोडत, आपलं बूड हलवत दिवसाचा शीण घालवत होती. सुंदरसिंह बोगद्यात दिव्याची ज्योत खालीवर करत उभा होता. त्याला हे सगळे आवाज ओळखीचे होतेच पण एक काहीतरी वेगळा आवाज – गादीच्या पावलांचा, वाळका पालापाचोळा तुडवल्याचा – त्याला क्षणभर सावध करून गेला. डोळे ताणून काही क्षण तो स्तब्ध उभा राहिला. नंतर हळू शीळ घालत तो सूरजकडे परतला. दहा मिनिटांत रात्रीची मेल गाडी येणार होती. सुंदरसिंह खाटेवर टेकताच एक नवा आवाज दोघांनाही स्पष्ट ऐकू आला – एक तालबद्ध आवाज, जणू कुणी झाडाची फांदी कापतोय.

"हा कसला आवाज?" सूरज कुजबुजला.

"बिबट्या आहे तो. बोगद्यात आलेला दिसतोय."

"गाडी येईल ना आत्ता".

"हो रे मित्रा. त्याला जर बोगद्याबाहेर नाही घालवला, तर ट्रेनखाली सापडून मरेल तो. आणि मी काही तसं होऊ देणार नाही."

"पण आपण त्याला घालवायला गेलो तर आपल्यावर हल्ला करेल ना तो?" रखवालदारासारखी काळजी आता सूरजलासुद्धा वाटू लागली.

"हा बिबट्या नाही करणार. तो मला ओळखतो. आम्ही एकमेकांना अनेक वेळा पाहिलंय. त्याला बकरं आणि भटक्या कुत्र्यांची आवड आहे, पण आपल्याला काही करणार नाही तो. तरी, मी माझी कुऱ्हाड घेऊन जातो, तू इथंच थांब सूरज."

"नको. मी येतो तुमच्याबरोबर. इथं अंधारात बसण्यापेक्षा ते बरं."

"ठीक आहे, ये. पण माझ्या मागे रहा आणि घाबरू नकोस."

दिवा उचलून, आणि त्या प्राण्याला घाबरवून पळवून लावण्यासाठी बेंबीच्या देठापासून ओरडत सुंदरसिंह बोगद्यात शिरला. सूरज मागेच होता, पण त्याच्या तोंडून काही आवाज फुटेना. त्याचा घसा अगदी कोरडा पडला होता. वीसेक पावलं आत ते शिरले असतील नसतील तेवढ्यात दिव्याच्या उजेडात तो बिबट्या दिसला. त्यांच्यापासून अवघ्या पाच मीटर अंतरावर! रुळांमधून चालत त्यांच्याकडेच येत होता. फार मोठा नव्हता तो, पण चपळ आणि बळकट ...

दात दाखवत, गुरगुरत तो पोटावर बसला. त्याची शेपटी चटचट हलत होती. आता सूरज आणि सुंदरसिंह दोघेही जोरात ओरडले. त्यांचे आवाज बोगद्यात घुमले. जणू अनेक भयंकर माणसं बोगद्यात असावीत असा भास बिबट्याला करून द्यायला तेवढं पुरेसं होतं. तो झट्कन मागे वळला आणि अंधारात नाहीसा झाला. तो नक्की निघून गेलाय याची खात्री करायला सुंदरसिंह आणि सूरज बोगद्याच्या दुसऱ्या टोकापर्यंत चालत गेले. जेव्हा ते माघारी झोपडीपाशी आले तेव्हा रुळांचा घुमणारा आवाज येऊ लागला. गाडी येत होती. सूरजने रुळावर हात ठेवला. त्याला रुळांचा कंप जाणवला. दूरवरून येणारा गाडीचा आवाज त्यानं ऐकला. थोड्याच वेळात वळणावरून इंजिन दिसलं – फुत्कार सोडत त्यांच्यावर चाल करून येणारं, अंधारात ठिणग्या सांडणारं, डोंगराच्या उंच कापलेल्या बाजूंमधून गर्जना करत, जंगलाला धूळ चारत येणारं. ते सरळ बोगद्यावर चाल करून गेलं, सूरजच्या स्वप्नातल्या त्या सुंदर ड्रॅगनसारखं त्याच्या अंगावरून जात बोगद्यात शिरलं. ते निघून गेल्याबरोबर सगळी शांतता परतली. जंगल पुन्हा श्वास घेऊ लागलं, पुन्हा जगू लागलं. फक्त रूळ अजून थरथरत राहिले. ते तसेच पुन्हा एका आठवड्याभरानंतर, तीच गाडी जात असताना, थरथरले. मात्र या वेळी सूरज आणि त्याचे वडील गाडीतून प्रवास करत होते. सूरजचे वडील वहीत काही हिशोबाच्या नोंदी करत बसले होते. सूरज उघड्या खिडकीतून अंधाराकडे डोळे लावून बसला होता. त्याचे वडील दिल्लीला कामासाठी निघाले होते. त्यांनी या वेळी सूरजला बरोबर न्यायचं ठरवलं होतं. ("हा नेहेमी कुठं भटकत बसतो कुणास ठाऊक" ते तक्रार करत, "त्यानं आता माझ्या व्यवसायाबद्दल काही शिकायला हवं ना.")

ती रातराणी शेकडो प्रवाशांना घेऊन जंगलातून धावत होती. डब्यांची चाकं रुळांवर ताल धरत होती. छोटेछोटे लुकलुकणारे दिवे आले आणि गेले तसतशी जंगलाच्या कडेवर वसलेली छोटी छोटी गावं मागं पडत गेली. एका छोट्या पुलावरून गाडी गेली त्याचा वेगळा आवाज सूरजने ऐकला. अंधारात कडेची ती झोपडी दिसणं शक्य नव्हतं, पण बोगदा येतो आहे हे त्याला कळलं. सूरज डोळे ताणून बघत होता आणि इंजिनाची कर्कश शिट्टी वाजली तसा त्याला तो दिवा दिसला. सुंदरसिंह दिसला नाही, पण त्याचा दिवा दिसला. आपला मित्र तिथं आहे हे सूरजला ठाऊक होतं. ट्रेन बोगद्यात शिरली, बाहेर पडली, तिनं जंगलाला मागं टाकलं आणि विस्तीर्ण मैदानावर गर्जत धावू कागली. सूरज अंधारात बघत राहिला. त्याच्या मनात ती एकटी पडलेली जंगलातली जागा, आणि तो दिवा धरलेला रखवालदार रेंगाळत राहिले. अंधाराला किंचित उजळवून वाफेच्या इंजिनांना आणि बिबट्यांना रस्ता दाखवणारा तो रखवालदार नेहमीच हजारो प्रवाशांसाठी केवळ एक साधा काजवा होता. तसाच राहणार होता.

**(रस्किन बॉण्ड यांच्या** Ruskin Bond's Children's Omnibus **या** Rupa and Co. **प्रकाशनाच्या पुस्तकातील** The Tunnel **या कथेचा साभार मराठी अनुवाद)**

**संपर्क : ९४२३५८६३४८**

# बालमनातील निसर्ग

■ रेखा वाल्मिक मराठे

एके दिवशी ताईने
फ्रॉकवर सांडली दौतभर शाई
फ्रॉक धुतल्याच्या पाण्यानेच
सागराला आली पहा निळाई

एके दिवशी दादाने
उलटा केला दुधाचा लोटा
म्हणूनच समुद्रात आल्या
शुभ्र फेसाळत्या लाटा

एके दिवशी आईकडून
जमिनीवर पडली हळद
पिवळ्याधम्मक सूर्याचा मग
रंग झाला आणखी गडद

चटणीची पिशवी
उडाली वाऱ्याने
म्हणूनच लाहीलाही होते
दुपारच्या उन्हाने

पुरणपोळी केली चुलीवर
धूर पसरला घरभर
म्हणूनच सकाळी सकाळी
धुके पसरले रस्त्यावर

साबणाच्या जाहिरातीत
बाई पाणी खूप ओतते
म्हणूनच नळाला आमच्या
आजकाल पाणी कमी येते

गृहपाठ सूर्याला आवडत नाही
मित्रांना शाळेत चटके देतो
चांदोमामाला घाबरून रात्री
डोंगराच्या कुशीत तोंड लपवतो

संपर्क– ९४२११६४५५२

मनोहर महादेव भोसले

# दहा रुपयांचे भांडवल

सोनू हुशार होता. तो शाळेमधल्या वक्तृत्व, निबंध, हस्ताक्षर, शुद्धलेखन, चित्रकला अशा विविध स्पर्धेमध्ये बक्षिसे मिळवत होता. अनेक जण त्याला यशाचे रहस्य विचारायचे. त्याला वाचनाची आवड होतीच. कथा, कविता तर खूप आवडायच्या.

कथा, कविता, कादंबरी अथवा इतर पुस्तके महाग होती. ती विकत घेणं शक्य नव्हतं. अशा वेळी त्याच्या डोक्यात एक आयडिया आली. प्रत्येक वर्तमानपत्रामधून आठवड्यातून एकदा विशेष पुरवणी येत असते. त्यामध्ये अनेक चांगल्या नवनवीन कथा, कविता, विविध विषयांवरचे लेख



असतात. शब्दकोडे, चित्र रंगवा, सुविचार अशी माहिती असते. यामधून बरंच काही शिकायला मिळेल म्हणून त्याने वर्तमानपत्र खरेदी करण्याचे ठरवले. पण, वडलांनी त्याला विरोध केला. ते म्हणाले,

"एक वर्तमानपत्र किती रुपयांना आहे?"

सोनू म्हणाला,

"५ रुपयाला."

"५ रुपयाला १, म्हणजे ३० दिवसांचे किती झाले?"

"१५० रुपये."

"एका वर्षांचे म्हणजे ३६५ दिवसांचे किती होतील?"

थोडा विचार करत गणित करून सोनू म्हणाला,

"१८२५ रुपये"

"मग तूच सांग, नुसत्या वर्तमानपत्रासाठी एवढे पैसे खर्च करणे आपल्याला परवडेल का?"

"........"

तो काही बोलला नाही. वडीलच त्याला म्हणाले,

"आणि या वर्तमानपत्रांची रद्दी शेवटी भंगारवाला विकत घेतो किती रुपयांना?"

"........" तो काहीच बोलला नाही. वडील स्वत: म्हणाले,

"१० रुपयांना. म्हणजे यालाच म्हणतात घर जाळून कोळसा विकणे."

वडलांच्या या बोलण्यावर मनोजचं डोकं सणकलं. तो चिडला. रागारागात म्हणाला,

"१० रुपये तर द्या मग...."

त्याचा राग शांत करण्यासाठी वडलांनी दहा रुपये दिले आणि डोळे पुसत तो निघून गेला. वडलांना वाटले तो आता दुकानात जाऊन गोळ्या, बिस्किटे खाईल आणि दररोज वर्तमानपत्रे खरेदी करण्याचे खूळ त्याच्या डोक्यातून निघून जाईल. पण तसे झाले नाही.

सोनूला माहीत होतं. आपल्या शेजारचे काका वर्तमानपत्र घेतात. त्यांच्या घरी जाऊन तो नम्रपणे म्हणाला,

"काका, तुम्ही दररोज जी वर्तमानपत्रं घेता त्याचं शेवटी काय करता?"

काका म्हणाले,

"रद्दीवाल्याला देतो."

"किती रुपयांना?"

"८ रुपये तर कधी १० रुपये किलो."

सोनू म्हणाला,

"काका, मी तुम्हांला १ किलोचे १० रुपये देतो. रद्दी मला देता का?"

"अरे.. आता घेऊन जा ना मग...."

काकांनी खूश होऊन दिलेली रद्दी एक किलोपेक्षा जास्तच होती. घरी येऊन सोनूने त्यामधल्या विशेष पुरवण्या बाजूला काढल्या. इतर बाकी पानांचा पुन्हा गठ्ठा बांधला. काही दिवसांनंतर त्याला रद्दीवाला दिसला. त्याने तो गठ्ठा त्याला १० रुपयाला विकला. वडलांनी दिलेले १० रुपये प्रत्येक महिन्याला भांडवलासारखे शिल्लक राहात गेले. शिवाय वर्तमानपत्राची विशेष पुरवणी मिळत गेली.


अशा प्रकारे सोनूने अभ्यासाबरोबर अवांतर वाचन, चित्राकला, सुंदर हस्ताक्षर, सुविचार संग्रह असे छंद जोपासले. वडलांना त्याचे खूप कौतुक वाटले.

**संपर्क : ९७६७०४४५०९**

## गंमत कोडे

घनश्याम देशमुख

**शेजारी दिल्याप्रमाणे गोल आकृतीमध्ये प्राणी/पक्षी काढा.**



‘किशोर’ हे मासिक मालक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, बालभारती यांचेकरिता, मुद्रक व प्रकाशक विवेक उत्तम गोसावी यांनी सोहेल एंटरप्रायजेस सर्व्हे नं. ४८, घर पट्टी नं. ४०२, भांडार्ली व्हिलेज, नॅशनल काट्याजवळ, ठाणे ४०० ६१२, येथे छापून ‘बालभारती’, सेनापती बापट रोड, पुणे ४११ ००४ येथे प्रसिद्ध केले. * संपादक– कृष्णकुमार पाटील.

**'Kishor' monthly publication is owned by Bureau of Text Book Production and Curriculum Research, Balbharati, Printed and Published by Vivek Uttam Gosavi, Printed at M/s. Sohail Enterprises, S.No. 48, Ghar Patti No. 402, Bhandarli Village, Near National Kata, Thane- 400 612 and Published at Balbharati, Senapati Bapat Road, Pune- 411 004 * Editor : Krishnakumar Patil.**


# हिरवाई

■ निर्मला सु. देशपांडे

पानामध्ये पान केळीचे
वर छान खाऊ खाण्याचे
पानामध्ये पान आंब्याचे
दाराला तोरण बांधण्याचे
पानामधे पान नागवेलीचे
विडा करून खाण्याचे
पानामध्ये पान तुळशीचे
शुद्ध हवा मिळण्याचे
पानामध्ये पान गवतीचहाचे
सर्दीवर काढा करण्याचे
पानामधे पान पुदिन्याचे
पाचक सरबत बनवण्याचे
पानामधे पानं कढिलिंबाचे
जेवण पाचक बनवण्याचे
पानामधे पान कडुलिंबाचे
हवा शुद्ध करण्याचे
पानामध्ये पान वडाचे
हवेचं शुद्धीकरण करण्याचे
सर्वच झाडांची पाने छान
हिरवाईचा त्यांना मान

संपर्क – ९९२१६६२८५५

प्रा. जी. एन. हंचे



# मोबाईल फोनचे दुष्परिणाम

आज सुमारे तीनशे दशलक्ष मोबाईल फोन्स भारतात वापरले जातात. हे प्रमाण पुढे भविष्यात आणखी वाढणारच आहे. आपण सर्व अशा फोन्समधून उत्सर्जित होणाऱ्या किरणांच्या माऱ्याला सामोरे जाणार आहोत. असे फोन्स दीर्घकाळ वापरल्यामुळे तसेच एकाच कानाचा वापर केल्यामुळे शारीरिक अपघात, धोके संभवतात. मोबाईल्सचे कार्य सुरळीत चालावे म्हणून सर्व देशभर मनोरे उभारले जात आहेत. त्यात सर्व कंपन्यांचा समावेश असतो. त्यातून इलेक्ट्रोमॅग्नेटीक किरण बाहेर फेकले जातात.

जेव्हा मोबाईलवर कॉल केला जातो त्या वेळी ध्वनीचे रेडिओ फ्रिक्वेंसी तरंग तयार होत असतात. त्यामुळे त्यातून इलेक्ट्रोमॅग्नेटीक ऊर्जा तयार होत असते. ज्या वेळी फोन घेतला जातो त्या वेळी त्याच्या उलटप्रक्रिया घडत असते. या तरंगाचे ध्वनीत रूपांतर होऊन त्यातून आवाज तयार होतो. तो फोन घेणाऱ्याला ऐकायला मिळतो. रेडिओ लहरी किंवा तरंग म्हणजेच इलेक्ट्रोमॅग्नेटीक किरण होत. अशा किरणांना एक प्रकारची विद्युत चुंबकीय क्षमता असते. अशा लहरी एकाच दिशेने पण एकमेकांना काटकोन करून प्रसारित होतात. जेथे असे तरंग तयार होतात त्या वातावरणाला इलेक्ट्रोमॅग्नेटीक (फील्ड) क्षेत्र म्हणतात. अशा लहरींची कंपन संख्या व लांबी हर्टस व मीटरमध्ये मोजली जातात.


अशा लहरींची किंवा तरंगांची ऊर्जा शरीरातील पेशीतून शोषली जाते. ती SAR या एककात मोजली जाते किंवा mw/g एककात मोजली जाते. अशी ऊर्जा इतर उपकरणांतून सुद्धा बाहेर पडत असते. उदा.-घरातील ओव्हन, रडार, टी.व्ही. सेट, फ्रीज, वॉशिंग मशीन वगैरे.

आपल्या भारत सरकारने अशा किरणोत्सारीत यंत्रणेतून किती प्रमाणात किरणोत्सर्ग बाहेर पडतो




याची नोंद करावी असा नियम केला आहे. हे सर्व DOT या खात्यामार्फत केले जाते. १६ वर्षांखालील मुलांनी अशी उपकरणे वापरू नयेत. त्याचप्रमाणे शाळा, दवाखाने या शेजारी प्रक्षेपक टॉवर उभा करू नये असे ठरले आहे.

विद्युत उपकरणातून जसे विद्युत प्रवाह वाहत असतात तसेच असे विद्युत प्रवाह अगदी सूक्ष्म प्रमाणात मानवी शरीरातून वाहत असतात. मानवी शरीरातील मज्जातंतूंमधून असे प्रवाह वाहत असतात त्यामुळे बाहेरील विद्युत भारीत क्षेत्राचा मानवी शरीरावर विपरीत प्रमाणात परिणाम होऊ शकतो. मोठ्या प्रमाणात विजेचा प्रवाह गेल्यास त्याचा परिणाम मज्जातंतू व स्नायूंवर होतो. याचा पेशीतील DNA प्रथिनांवरसुद्‌धा होऊ शकतो. शरीरातून मोठ्या प्रमाणात अशी ऊर्जा प्रवाहित झाली तर तिच्यातून मोठ्या प्रमाणात उष्णता निर्माण




होते. या उष्णतेमुळे डोळे, अंडकोश, शुक्रतंतू यावर विपरीत प्रमाणात होतो. काही ऊर्जा उष्णता विरहित असतात त्याचाही विपरीत परिणाम डोळ्यांभोवती व मेंदूतील अर्बुदावर होत असतो. काही वेळेला काही व्यक्तींत हायपर सेन्सिटिव्हीटी तयार होते. त्यामुळे कातडी लाल होते, हातापायांना मुंग्या येणे, छातीत जळजळणे असे विकार घडू शकतात. फोन वाजत नसतानाही तो वाजत आहे असा भास काहींना होतो. स्मृतिभ्रंशासारखे मनोविकार होण्याची शक्यता असते. हृदयातील ठोक्यांवरही याचे दुष्परिणाम होऊ शकतात. या लहरींचा उंदरावर प्रयोग केले असता शरीरातील DNA खराब होणे, शुक्रजंतूचे प्रमाणे कमी होणे, व्यंध्यत्व येणे असे परिणाम आढळून आले. व्यक्तींच्या झोपेवरही वाईट परिणाम होऊ शकतो. काही वेळेला लठ्ठपणाही वाढू शकतो. मोबाईल फोनवरून संभाषण करत वाहन चालवणे हे मद्यपान करून वाहन चालवण्यासारखेच आहे. विशेषत: अशा मोबाईलचा उपयोग ऑपरेशन थिएटरमध्ये किंवा अतिदक्षता विभागात करणे तर अतिधोक्याचे असते. मोबाईलच्या अतिवापरामुळे कॅन्सरचा धोका वाढतो किंवा ब्रेनट्युमरचा धोका असतो. मोबाईल फोनमधून निघणाऱ्या इलेक्ट्रोमॅग्नेटीक रेडिएशनचे अंड्यावर प्रयोग केले ज्यात १५ मिनिटांत अंडे गरम झाले. एरव्ही तासाने ते उकडले गेले असते. (अंड्याच्या दोन्ही बाजूला दोन मोबाईल सतत चालू ठेवून हा प्रयोग केला गेला.)

पक्ष्यांवरही असे प्रयोग केले गेले, त्या वेळी अंड्यातून पिल्ले बाहेर येण्यापूर्वीच ती नष्ट झाली होती. अन्न, वायू, ध्वनी, पाणी प्रदूषण हे मानवी शरीराला हानीकारक आहेत. तसेच खाण्यापिण्याच्या सवयी उदा. पिझ्झा, बर्गर, वडापाव, चायनीज फूड, फास्टफूड हे अपायकारक आहेत. शिवाय मानवी शरीरावर धूम्रपान, मद्य वगैरेचा दुष्परिणाम होत असतो.

**संपर्क– ९१४५९७६५३७**

# पोस्टमन काका

■ रवींद्र चालीकवार

पोस्टमनकाका पोस्टमनकाका
रोज रोज वाटता पत्र
खुशालीचा निरोप देत
बनता सर्वांचे मित्र


खाकी पोशाख
शोभून दिसतो अंगावर
जाड पिशवी उघडून
पत्र वाटता भराभर

काळजीने बजावता तुम्ही
आपले चोख काम
ऊन असो पाऊस असो
मुळीच नसतो आराम

सायकलची घंटा वाजवत
येता तुम्ही दारी
मनीऑर्डर दिली की
आम्हां खुशी होते भारी

पोस्टमनकाका पोस्टमनकाका
सांगा ना मला खरं
तुम्हांला हो कशी माहीत
सगळ्यांची घरं?

**संपर्क – ९०११५५९१०६**



# कुतूहल

अमित डहाणे, ९४२१०५०३८८

‘किशोर’ मित्रांनो, ‘किशोर’ डिसेंबर २०२३ च्या अंकातील कुतूहलची किती उत्तरे तुम्ही बरोबर दिलीत? या अंकात दिलेल्या उत्तरांशी आपण दिलेली उत्तरे ताडून पाहा. तुमच्यासाठी आणखी काही प्रश्न दिले आहेत. स्पर्धकांनी प्रश्नांची उत्तरे कोणाचीही मदत न घेता स्वतंत्रपणे लिहून पाठवण्याचे पथ्य काटेकोरपणे पाळावे. अचूक उत्तरे ‘किशोर’कडे २५ जानेवारी २०२४ पूर्वी अनुक्रमणिकेतील पत्रव्यवहाराच्या पत्त्यावर पाठवावीत.

**१) बिशनसिंग बेदी हे कोणत्या क्षेत्राशी संबंधित व्यक्तिमत्त्व होते?**

१) चित्रकला २) राजकीय
३) क्रिकेट ४) हॉकी

**२) क्रिकेट विश्व चषकातील सर्वात वेगवान शतक कोणत्या खेळाडूने केले आहे?**

१) रोहित शर्मा २) विराट कोहली
३) एडन मार्करम ४) ग्लेन मॅक्सवेल

**३) मतदारांमध्ये मतदानासंबंधी जागृती करण्यासाठी कोणाची ‘सदिच्छादूत’ म्हणून निवड करण्यात आली आहे?**

१) सचिन तेंडुलकर २) अमृता खानविलकर
३) राजकुमार राव ४) अमिताभ बच्चन

**४) भारतातील सर्वात अधिक वनांचे क्षेत्र कोणत्य राज्यात आहे?**

१) मध्य प्रदेश २) महाराष्ट्र
३) ओरिसा ४) कर्नाटक

**५) जपान या देशाला उगवत्या सूर्याचा देश असे म्हणतात कारण की .......**

१) जपान पूर्व गोलार्धात आहे
२) जपान पश्चिम गोलार्धात आहे
३) पृथ्वीची परिवलन दिशा आणि जपानचे रेखावृत्तीय स्थान
४) पृथ्वीची परिवलन दिशा आणि जपानचे अक्षवृत्तीय स्थान

**६) मानवी शरीराच्या वजनाच्या सुमारे किती टक्के पाणी मानवी शरीरात असते?**

१) ६०-७० २) ८०-९० ३) ४०-५० ४) ३०-४०

**७) खालील कोणते खनिज ‘ऊर्जा खनिज’ या प्रकारात मोडते?**

१) लोह २) चुनखडी
३) दगडी कोळसा ४) मँगनीज

**८) ‘वन नेशन वन स्टुडंट’ म्हणून ओळखली जाणारी केंद्र शासनाची योजना कोणती?**

१) स्वयंचलित स्थायी शैक्षणिक खाते नोंदणी
२) मेरा स्टुडंट मेरा अभिमान
३) हर स्टुडंट देश का भविष्य
४) देश का आधार हर स्टुडंट

**९) फुटबॉल क्षेत्रातील मानाचा समजला जाणारा ‘Ballon d'or’ आठव्यांदा कोणाला मिळाला आहे?**

१) लायोनेल मेस्सी २) रोनाल्डीन्हो
३) इर्लिंग हालँड ४) ऐटाना बोनमाटी

**१०) ‘न पेटलेले दिवे’ ही कादंबरी कोणत्या साहित्यिकाची आहे?**

१) प्रा.राजाभाऊ शिरगुप्पे
२) रामदास फुटाणे
३) ना. धो. महानोर
४) राजन मिटकरी

**११) ‘१० वे विश्व साहित्य संमेलन’ कोठे पार पडले?**

१) सिंगापूर २) लक्षद्वीप
३) मलेशिया ४) भूतान

**१२) ‘टाइम्स’ या जगप्रसिद्ध मासिकाच्या मुखपृष्ठावर नुकतेच कोणाचे चित्र झळकले?**

१) नरेंद्र मोदी २) शेख हसीना
३) पुतीन ४) जो बायडन

१३) **जगातील सर्वात उंच पूल कोणत्या नदीवर बांधण्यात येत आहे?**
१) गंगा २) चिनाब ३) ब्रम्हपुत्रा ४) गोदावरी

१४) **जगातील सर्वोत्कृष्ट शाळा पारितोषिक २०२३ या वर्षाकरिता कोणत्या शाळेला जाहीर झाले आहे?**
१) अहमदाबादची रिव्हरसाइड शाळा
२) दिल्लीची पब्लिक शाळा
३) पुण्याची सिम्बायोसिस शाळा
४) मुंबईची पब्लिक शाळा

१५) **भारताचे '१२ वे मुख्य माहिती आयुक्त' म्हणून कोणाची नेमणूक करण्यात आली आहे?**
१) रमेश बैस
२) मनोरंजन मिश्र
३) हिरालाल सामरिया
४) राजेंद्र मेन



## चित्रकोडे
रचना - घनश्याम देशमुख

## चित्रकोडे डिसेंबर २०२३ चे उत्तर




### कुतूहल डिसेंबर २०२३ ची उत्तरे

| | | | |
|---|---|---|---|
| १) ४ | ५) २ | ९) २ | १३) ४ |
| २) ४ | ६) १ | १०) २ | १४) ३ |
| ३) ३ | ७) ३ | ११) १ | १५) १ |
| ४) १ | ८) १ | १२) २ | |

### चित्रकोडे ऑक्टोबर – नोव्हेंबर २०२३ यशस्वी स्पर्धक

- पुणे – कु. अनिकेत भवार, कु. प्रणव दाभाडे, कु. प्रणव दाभाडे, कु. यश खिरीड, कु. अनिकेत भवार, कु. शाश्वत भवार, कु. पंकज भवार
- सातारा – कु. सुवीर फडे
- सांगली – कु. शांभवी कुलकर्णी
- ठाणे – कु. वेदिका घाग, कु. अभिनव जोशी
- यवतमाळ – कु. वेदश्री जयसिंगपुरे, कु. प्रचित रवाळे, कु. रिशांक जयसिंगपुरे, कु. जान्हवी कुमरे
- नंदुरबार – कु. राहुल पाडवी
- नाशिक – कु. अन्वित अडनोर
- सिंधुदुर्ग– कु. धनश्री धुरी, कु. खुशी धुरी, कु. वासंती धुरी, ध्रुव कांदळगांवकर
- कोल्हापूर – कु. शौर्य माळी
- रत्नागिरी – कु. सुमुख केतकर
- परभणी – कु. श्रुती धोपटे
- नागपूर – कु. नीरजा कुलकर्णी




**माणूस जेव्हा एखादी चांगली गोष्ट करतो, तेव्हा आपण त्याला चांगला म्हणतो. अशा चांगल्या गोष्टी तुम्हीही नक्कीच केल्या असतील.**

- **तुम्ही दुसऱ्यांबद्दल आपुलकी आणि सहानुभूती दाखवता का?**
- **जे तुमच्यापेक्षा लहान आणि दुर्बल आहेत त्यांचे रक्षण करता का?**
- **ज्यांना मदतीची गरज आहे त्यांना मदतीचा हात देऊ करणे म्हणजे चांगुलपणा, असे तुम्हांलाही वाटते ना?**

**मग लागा पाहू लिहायला. त्यासाठी सदर आहे – 'भावी आधारस्तंभ'. तुम्हांला मानधन व वर्षभर अंक मिळेल. तुम्ही केलेल्या सत्कृत्याचा १० ते १५ ओळी मजकूर सुवाच्य अक्षरांत लिहा. तुमचे संपूर्ण नाव, पत्ता (पिनकोड नंबरसह), शाळेचे नाव, वय, इयत्ता इत्यादी तपशील द्या. पासपोर्ट आकाराचा फोटोही लावा. पाकिटावर रु. ५/– चे तिकीट लावून अनुक्रमणिकेतील पत्रव्यवहाराच्या पत्त्यावर पाठवा.**



माझे नाव स्मिता, मी इयत्ता सहावीमध्ये आहे. मी उन्हाळ्याच्या सुट्टीसाठी माझ्या मामाच्या गावाला, भुसावळ येथे गेले होते. दोन-तीन दिवसांनी मामा आम्हांला 'हॉटेल मल्हार' येथे नाश्ता करायला घेऊन गेले.

बाहेर येताना तेथे एक लहान ७-८ वर्षांची मुलगी व तिचा भाऊ ५-६ वर्षांचा असेल. ते दोघे फार आशाळभूतपणे पाहात होते. बहुतेक रात्रीपासून भुकेले होते. मला खूप वाईट वाटले मी मामांना सांगितलं. तर जवळच्या हॉटेलातून मामांनी त्यांच्यासाठी कचोरी आणली, आम्ही त्यांना हाक मारली. ते दोघे आले. आम्ही त्यांना कचोरी आणि पाण्याची बाटली दिली. त्यांना खूप आनंद झाला. आमचे आभार मानून ते निघून गेले. आम्हांलाही खूप समाधान वाटलं. नाष्टा करताना मी भाताचा एकूण एक शीत संपवला. जगात खूप लोक उपाशी राहतात. अन्न वाया घालवू नका.

**कु. स्मिता योगेश वडनेरे ,** इयत्ता. सातवी,
अहिल्यादेवी कन्या विद्यालय, धुळे. (जि. धुळे)



मी एकदा मामाकडे गेली होती. मामाकडे आम्ही गल्लीमध्ये सर्व मुले खेळत होतो. खेळता-खेळता माझे लक्ष एका पायरीवर बसलेल्या आजीकडे गेले. आजीच्या चेहऱ्यावर काळजी दिसत होती. आजीकडे पिठाचा डबा होता, तिला घरी जायचे होते, पण ती खूप थकली होती, तिला खूप घाम आला होता, मी पटकन माझ्याकडे असलेल्या बाटलीमधील पाणी आजीला दिले आणि तुझा पिठाचा डबा मी तुझ्याघरी पोहचून देते असे म्हणून डबा घेऊन मी आजीला तिच्या घरी पोहचून दिले. आजीच्या चेहऱ्यावर खूप समाधान दिसत होते. आजीने माझ्या डोक्यावर हात ठेवला आणि मला म्हणाली, "गुणाची बाई माझी ती." मी हसतच घरी परत आले. आजीची मदत केल्यामुळे माझ्या आईलासुद्धा आनंद झाला, तिने मला शाबासकी दिली.

**कु. प्रांजु शरद सिरसाट**
इयत्ता ७ वी, जि.प.पूर्व माध्य म.शाळा, जैनपूर,
ता. दर्यापूर, जि. अमरावती ४४४७०६



मी व माझा परिवार आम्ही सर्व जण वझेगावला दरवर्षी जात असतो. यावर्षी सुद्धा आम्ही तेथे गेलो होतो. माझी मैत्रीण नंदिनी माझ्यासोबत आली होती. तेथे आम्ही रामचंद्र महाराजांच्या समाधीचे दर्शन घेतले. आम्ही तेथील परिसरात खेळत असताना आम्हांला एक आजी दिसली. ती खूप थकलेली होती. ती खूप वेळेपासून आम्हांला पाहत होती. नंदिनी आणि मी बिस्कीट खात होतो. त्या आजीला खूप भूक लागली असेल असे मला वाटले. मी तिला माझ्याजवळची काही बिस्कीटे दिली. माझ्याकडचे बिस्कीट घेतल्यावर ती खूप गोड हसली आणि माझ्या डोक्यावर हात ठेवला. तिच्या चेहऱ्यावरचे हसू पाहून मला खूप बरे वाटले. आई नेहमी सांगत असते की तहानलेल्यांना पाणी व भुकेल्याला अन्न देण्यात जो आनंद आहे तो कशातच नाही. आम्ही तेथून घरी येण्यासाठी निघालो तरी मला आजीचा चेहरा आठवत होता.

**कु. भक्ती रामपाल उदेवाल**

इयत्ता ५ वी, जि. प. पूर्व माध्यमिक शाळा,
जैनपूर, ता. दर्यापूर, जि. अमरावती ४४४७०६



एकदा मी रविवारी बाहेर खेळत होते. तेव्हा मला मांजरीच्या पिल्लाचा आवाज आला. मी धावत त्या आवाजाच्या दिशेने गेले. मला तिथे एक बॉक्स दिसला. त्याच्या आत एक गोंडस आणि पांढरे शुभ्र मांजरीचे पिल्लू होते. मी त्याच्या जवळ गेले. ते पिल्लू माझ्याकडे पाहतच राहिले. मी त्याला अलगद उचलले आणि माझ्या घरी घेऊन आले. त्याला दूध चपाती दिली. त्याला खूप भूक लागली होती. म्हणून त्याने चपाती व दूध पटापट संपवले. नंतर मी त्याला अंघोळ घातली. माझ्याकडे माझ्या घराशेजारची माझी मैत्रीण आली. तिने मला विचारले, ''तू माझी मांजर पाहिलीस का?'' मग मी तिला विचारले ''तुझी मांजर पांढऱ्या रंगाची आहे का?'' तर हो म्हणाली, मग मला समजले, की ही मांजर तिचीच आहे. मी न थांबता लगेच मांजरीला बाहेर आणले. मांजर उडी मारून तिच्याकडे गेली. मला हे दृष्य पाहून खूप खूप आनंद झाला.

**कु. साक्षी संतोष फाळके**

इयत्ता ६ वी , जि.प. प्रा शाळा बौर,
ता. मावळ, जि. पुणे ४१०४०५



माझे नाव श्रावणी. मी इयत्ता चौथीमध्ये आहे. आमच्या शाळेपासून माझे घर लांब आहे. मी वावरात गेले तेव्हा फासा टाकला होता. त्यामध्ये कबुतराचा पाय गुंतला होता. ते फडफड करीत होते. मग मी बघितले होते. मी त्याच्या पायातला दोरा काढला आणि त्याला उचलले. त्यानंतर ते माझ्या हातातून उडून गेले. ही माहिती वर्ग शिक्षक व मुख्याध्यापक रा. ना. शिंदे यांनी सांगितली. त्यांनी परिपाठात माझे कौतुक केले. अभिनंदन केले.

**कु. श्रावणी अमर पलघडमल,** जि. प. प्रा. शाळा, कडुवस्ती (सात्रळ),
ता. राहुरी, केंद्र सोनगाव, जि. अहमदनगर ४१३७११

उमलती प्रतिभा



# किशोर पक्षी

मंजूळ अन् गोड
गाई कोकिळा गाणी
हिरव्या पोपटाची
शुद्ध वाणी

पावसात नाचायला
मोराला आवडते
पिंजऱ्यात कोंडून राहणे
पोपटाचे नावडते

उंच आकाशात घिरट्या
घाली घार
झाडावरील ढोलीत
राहते खार

चिवचिव करत चिमणी
आली माझ्या अंगणी
कावकाव करत कावळा
फिरत असे नभांगणी

सुंदर पक्षी निसर्गात
भाऊ त्यांची महती
करा पक्ष्यांचे संवर्धन
संदेश पसरवा जगती


**कु. वृषाली धनाजी पाटील**
इ. सहावी, केंद्रीय प्राथमिक
शाळा, वेतवडे,
ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर




# पुस्तकं

पुस्तकाला पुढून असते मुखपृष्ठ,
तसेच असते शेवटून मलपृष्ठ.

पुस्तकात असतात खूप गोष्टी,
सामावलेली असते सगळी सृष्टी.

पुस्तकं वाचायला आवडतात मला,
शिकता येतात त्यातून अनेक कला.

पुस्तकात कविता लिहितात कवी,
त्यातून मिळते माहिती नवी.

संस्कार करणारे असतात त्यात धडे,
शिक्षण घ्यायला मुले येतात शाळेकडे.

वाचनालयात जाऊन वाचावी पुस्तकं,
त्यामुळे सुधारतात आपली मस्तकं.

पुस्तक वाचतो आम्ही नवे,
सगळ्यांनीच ते वाचायला हवे.


**कु.वैष्णवी सिद्धार्थ मस्के**
इ. आठवी, जि.प.प्रा.शाळा, रायपूर,
ता.सेलू, जि. परभणी ४३१५०३



**कु. ध्रुव संतोष जगदाळे**
इयत्ता ३ री, केंब्रीज हायस्कूल वडूज,
ता. खटाव, जि. सातारा ४१५५०६




**कु. पायल दिनेश बागे**
इयत्ता ७ वी, जि. प. शाळा, कवठळ,
ता. संग्रामपूर, जि. बुलडाणा ४४४२०१



**कु. धनश्री भगवान धुरी**
जि. प. पू. प्राथ केंद्र शाळा, शेर्ले नं. १, मु. पो. शेर्ले
(नागधुरीवाडी), ता. सावंतवाडी, जि. सिंधुदुर्ग

# मदतगार मुले

एक खूप मोठे गाव असते. त्या गावात दिनेश आणि दिपिका नावाची मुले राहत होती. ते दोन्ही भाऊबहीण असतात. ते खूप स्वाभिमानी व लहानपणापासून ते म्हाताऱ्या माणसांना मदत करत असतात. त्यांच्या वडलांचे नाव सचिन असते व आईचे नाव कल्पना असते. एके दिवशी दोघे भाऊबहीण शाळेत जात असतात. त्यांची बस यायच्या आधी त्यांना एक म्हातारा माणूस दिसतो. त्या माणसाला डोळ्याने दिसत नसते आणि त्या म्हाताऱ्या माणसाला रस्ता ओलांडता येत नसतो. कारण रस्त्यावर खूप वाहने असतात. मग त्या दोघी भाऊबहिणींनी दृष्टिहीन आजोबांना रस्ता ओलांडण्यात मदत केली. असे ते दोघी भाऊबहिणींनी लहान मुलांपासून ते म्हाताऱ्या माणसापर्यंत हात दिला आहे.


**कु. यामिनी संदीप गोसावी**
इयत्ता – पाचवी, शाळा– सौ. कमलताई
प्र. दलाल माध्यमिक स्कूल, जि. धुळे


पाठलाग
घनश्याम देशमुख
संपर्क : ९८२३४१३६२९
इकडे या लवकर... या दोघांना पकडा आणि बांधून ठेवा.
या मुलाने आपला प्लॅन चौपट केला... थांब तुला चांगलाच धडा शिकवतो...
गप्प बस
गण्या झाडाआडून हे बघत होता.
दगडू पकडला गेला आता मला काहीतरी करायला हवं.
कपिलाला मी दिसलोय. ती इकडेच बघत आहे.
ती मला नक्कीच मदत करेल.


दगडूने एक वेगळ्याच प्रकारची शिट्टी वाजवली.
कपिला गाईला आपल्या मालकाचा तो इशारा कळला असावा.
तिने धावत येऊन दगडूला पकडलेल्या माणसाला धडक दिली.
अरे देवा! आता ही गाय कुठून आली?
त्याच संधीचा फायदा घेत गण्याने बाजीरावावर दगड फिरकावला.
ओय!
क्रमशः

# गंमतपूरची राणी

■ मंदा खांडगे
संपर्क – ९३२६८४२२०५



गंमतपूरच्या राणीचा
न्याराच थाट
तिच्या गंमत महालात
लावलेत दिवे एकशे साठ.

सात फुले बकुळीची
तिने केसात माळली
भांगात घातला
चांदीचा चुरा.

चांदीच्या चुऱ्यावर
पोवळ्यांची रास
शालूच्या पदरावर
काजव्यांचा नाच.

चमचमत्या किनारीवर
गोंडे लालेलाल.
गंमतपूरच्या राणीचा
न्याराच थाट

ऐनेदार लाकडाची
हरणाची बग्गी
रोज पहाटवेळी
त्यातून फिरते ती
गाणे गात गात.

त्याच वेळी गंमत महालातील
दिवे उजळतात एकशेसाठ

इंग्रजी विभाग

# A Voyager's Story

■ Aditya A. Gadhe

*Another day of the voyage,*
*ends with a sigh,*
*still there's a corner in my room,*
*and that's where I lie.*
*Nothing to achieve,*
*just a dream I see,*
*but the ambitions inside,*
*are again stopped by me.*
*I think about the setting sun,*
*over and over,*
*my brain stands off the shore,*
*wandering where to hover.*
*I know my path,*
*from beginning to the finishing line,*
*but the thought to travel,*
*Is what takes up my time.*
*The ship, the aim,*
*all are fine,*
*but the route to travel upon,*
*yet isn't mine.*
*Nobody and No one,*
*are along with me,*
*but I know my destination,*
*standing across the sea.*
*The vision of mine,*
*is completely clean,*
*I sail with the thought,*
*to surely win.*

*Contact : 9404490002*



*Smita Pramod Saraf*

# The Priceless gifts

I am a teacher in a government school in a rural area. Most of my students are from poor landless workers' families. Their parents work hard in farms on daily wages and it is very hard for them to make both ends meet. But in-spite of such adverse situations, the students are happy. They attend school and study hard. Being a primary teacher, I have always gained a lot of love and affection from my students.

I want to share my experience that fills me with pride. Last year, it was a certain Sunday. I was in a complete holiday mood. I was relaxing. I never celebrate my birthday with cakes or parties. But my granddaughter Shariwa gave me a surprise visit. She came from Pune just to celebrate my birthday. All the arrangements were made by Shariwa. She decorated the hall with balloons. She bought an expensive cake from the 'Cake



Gallery'. I wore a beautiful paithani with golden ornaments. All my family members and neighbours greeted me. My inbox was full of birthday wishes. My friends offered me nice gifts. I had never celebrated my birthday like this. I couldn't let my grand daughter down and decided to enjoy and go with the flow.

After the celebration, Shariwa offered me a beautiful saree. It was my favourite Green colour! Then she hugged me and kissed me with love. I was about to cry. I could not control my emotions. My tears started rolling down. Shariwa wiped off the tears with her handkerchief. She asked, "Aaji, whats wrong with you? Did I hurt you?"



"No dear, you just made me emotional." Then she asked, "Aaji, have you celebrated your birthday ever?" "No dear but my students always remember my birthday and celebrate it in their own little way." "Really Aaji, Simply great! What's the most precious gift that you have received from them?" "Oh! So many! You may find them cheaper, but they are most precious, rather priceless for me. Last year, one of my tribal students gifted me with fresh honey that he had himself collected from the honeycomb. Another one brought kharvas for me" "What is kharvas Aaji?"asked little Shariwa innocently. I hugged her and informed, "The Fresh milk obtained after cow or buffalo gives birth to a baby is nutritious and thick for the first 3 days. This milk is used to make kharvas. It is healthy and very tasty. Lalita made kharvas for me. It was truly delicious because she had added all her love and affection towards me while making it. My students are from poor families, but they are creative and ingenious. Harsha collected flowers from her backyard and made a nice bouquet for me. Payal made a lovely greeting card, Diya made quilling paper earrings, Shakuntala wrote a letter and expressed her feelings."

"Really aaji, You are so lucky to have such lovely students."


"Yes dear, they are amazing. I feel proud to have such diamonds." Shariwa hugged me again. The cute and innocent faces of my students flashed in front of my eyes. I whispered to myself, "Thank you my sweethearts, my kiddos, you all add meaning to my life and make it beautiful with your presence." Before going to bed, Shariwa again hugged me. I kissed her and burst out, "You also are a priceless gift to me, you are a priceless gem in my treasure of life!! Thank you for coming into my life, for coming home and making this day so special for me and reminding me of my lovely students who bring so much value to my life!!

Contact : 8698257406

# Funny Puzzle


Ghanshyam Deshmukh

This new animal is formed by joining the parts of the six animals. Write the names of those six animals.



______________
______________
______________
______________
______________
______________


**Find the identical twins.**



# चित्रकोडे

रचना - घनश्याम देशमुख

हे चित्रांचे शब्दकोडे आहे. यात चित्रांची नावे लपलेली आहेत. प्रत्येक चित्र बघून खालील चित्रकोडे पूर्ण करा.




## सूचना

१) स्पर्धकांनी आपले नाव केवळ पाकिटावर न लिहिता कोडे सोडवले असेल त्या कागदावर लिहिणे आवश्यक आहे.

२) कोड्याचे उत्तर पाठवण्याची अंतिम तारीख २५ जानेवारी २०२४.

३) कोड्याचे उत्तर फेब्रुवारी २०२४ च्या अंकात प्रसिद्ध होईल.

४) कोडे वेगळ्या कागदावर सोडवले तरी चालेल.

Registered R.N.I.NO. 22679/72

Kishor (Marathi) Postal Regd.No. PCW/076/2021-2023 Registered Newspapers posted at PUNE PSO, GPO- 411 001
The date of publication 26.12.2023 Posting on 27th & 28th December 2023
License to Post without prepayment of postage No. WPP-53

किशोर किशोर

किशोरची वर्गणी भरा आता ऑनलाईन!
वार्षिक वर्गणी ८० रुपये
(दिवाळी अंकासह)

पुढील वेबसाईटला भेट द्या. www.kishor.ebalbharati.in

किशोर: ज्ञान आणि
मनोरंजनाचा अद्‌भुत खजिना
बालभारतीचे प्रकाशन

महाराष्ट्रातील
मुलांचे सर्वांत
लाडके मासिक

५३ वर्षांची
अविरत परंपरा





संपर्क : ०२०-२५७१६२४४

ऑनलाईन
वर्गणीकरिता
क्यूआर कोड
स्कॅन करा

If not delivered please return to :
संपादक, 'किशोर' मासिक
महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व
अभ्यासक्रम संशोधन मंडळ,
बालभारती, सेनापती बापट मार्ग,
पुणे- ४११ ००४.
दूरध्वनी : ०२०- २५७१६२४४
ई-मेल : executive_editor_kishor@ebalbharati.in
वेबसाईट : www.kishor.ebalbharati.in

प्रति,